



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६४ वे * अंक १२४ * नांदेड * रविवार, दि. ११ मे २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# अखेर युद्ध थांबलं, दोन्ही देशांकडून युद्धबंदीला संमती!

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** गेल्या ८ दिवसांपासून भारत आणि पाकिस्तान यांच्यात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीला अखेर विराम मिळाला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या ट्विटर अकाऊंटवरुन यासंदर्भात माहिती दिल्यानंतर आता भारत सरकारने देखील अधिकृतपणे घोषणा केली आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी पत्रकार परिषद घेऊन याबाबत माहिती दिली. शनिवारी सायंकाळी ५ वाजल्यापासून भारत आणि पाकिस्तान यांच्यात पुन्हा शस्त्रसंधी लागू होत असल्याचं त्यांनी जाहीर केलं.

२२ एप्रिल रोजी पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यानंतर दोन्ही देशांच्या सीमारेषेवर तणावर होता. या तणावानंतर भारताने ७ मे रोजी एअर स्ट्राईक करत पाकिस्तानमधील ९ दहशतवादी तळांना लक्ष्य केलं होतं. त्यानंतर, भारत आणि पाकिस्तान यांच्या युद्धजन्य परिस्थिती उद्भवली. दोन्ही बाजूंनी गोळीबार आणि हवाई हल्ले सुरू होते. अखेर, या हल्लेखोरीला अखेर युद्ध विराम मिळाला आहे.

परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री म्हणाले, पाकिस्तानच्या लष्करी ऑपरेशन्स महासंचालकांनी (डीजीएमओ) शनिवारी दुपारी ३:३५ वाजता भारतीय लष्करी ऑपरेशन्स महासंचालकांना फोन केला. दोन्ही बाजूंनी भारतीय प्रमाणवेळेनुसार ५ वाजतापासून दोन्ही बाजूंकडून जमिनीवर, हवेत आणि समुद्र असा सर्वप्रकारचा गोळीबार आणि लष्करी कारवाई थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शनिवारी या सामंजस्य कराराची अंमलबजावणी करण्यासाठी दोन्ही बाजूंना सूचना देण्यात आल्या आहेत. लष्करी ऑपरेशन्स महासंचालक १२ मे रोजी दुपारी १२ वाजता पुन्हा चर्चा करतील. त्यामुळे, भारत आणि पाकिस्तान यांच्या सुरू असलेल्या हल्ल्यांना पूर्णविराम मिळाला आहे.

## युद्ध थांबलं पण दहशतवादविरुद्ध कारवाई थांबणार नाही

पाकिस्तानकडून ३.३५ वाजता फोन आला, त्यानंतर शनिवारी सायंकाळी ५ वाजल्यापासून भारत आणि पाकिस्तान यांच्यात शस्त्रसंधी लागू होत असल्याचं त्यांनी जाहीर केलं. त्यानंतर, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी ट्विट करुन युद्धविरामाची माहिती दिली. तसेच, दहशतवादाविरूद्धची भारताची भूमिका आजही कायम असल्याचे पाकिस्तानला ठणकावलं आहे. 'भारत आणि पाकिस्तान यांच्यातील गोळीबार आणि सैन्य दलाच्या कारवायांना थांबविण्यास दोन्ही बाजूंनी सहमती दर्शविण्यात आली आहे. पण, भारताने सर्वच ताकदीनीशी दहशतवादाविरुद्ध आपली भूमिका सातत्याने स्पष्ट केली. सैन्य कारवाया थांबल्या पण दहशतवादाविरुद्धची हीच भूमिका यापुढे देखील कायम राहिल', असे ट्विट परराष्ट्रमंत्र्यांनी केलं आहे.

## पाकिस्तानकडून अवघ्या ३ तासांत शस्त्रसंधीचे उल्लंघन

भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धाची परिस्थिती कायम आहे. वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर आज दुपारी ३.३५ वाजता पाकिस्तानच्या लष्करी महासंचालकांनी भारतीय लष्करी महासंचालकांना संपर्क साधला आणि शस्त्रसंधीचा प्रस्ताव दिला. त्यानंतर भारतीय प्रमाणवेळेनुसार सायंकाळी ५ वाजल्यापासून युद्धजन्य कारवाया थांबवण्याचे दोन्ही देशांनी मान्य केले. अखेर आज सायंकाळी ५.३० वाजल्यापासून पूर्णविराम मिळाला असे वाटत असतानाच रात्री ८:३० वाजता पाकिस्तानकडून शस्त्रसंधीचे उल्लंघन करत जम्मू मधील सीमा भागात हल्ला करण्यात आला.

# विद्युत पुरवठा सुरळीत राहील याची दक्षता घ्या -जिल्हाधिकारी

- जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला महावितरणच्या कामांचा आढावा
- सतत वीज गुल होत असल्याने नागरिकांतून संताप



**नांदेड (प्रतिनिधी)–** सध्या नांदेड जिल्ह्याचा पारा ४३ अंशांच्या जवळपास असून हवेत प्रचंड उकाडा वाढला आहे. त्यामुळे ग्राहकांची विजेची मागणी वाढली असून पुरवठा कमी पडत आहे. त्यामुळे वारंवार विज पुरवठा बंद पडण्याच्या घटना वाढल्या असून नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. याबाबत म हावितरण विभागाने आवश्यक त्या उपाययोजना करुन विद्युत पुरवठा सुरळीत राहील यांची दक्षता घ्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

शनिवारी जिल्हाधिकारी कार्यालयात महावितरण विभागाच्या कामाचा आढावा जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी घेतला. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, अधिक्षक अभियंता सुधाकर जाधव, कार्यकारी अभियंता विनय बहादूर, रुमदेव चव्हाण, मंगेश बोरगावकर तसेच महावितरण विभागाच्या अधिकारी कर्मचारी आदीची उपस्थिती होती.

यावेळी मान्सूमपुर्व कामे प्राधान्याने करा, विजेच्या समस्याबाबत ग्राहकांशी, नागरिकांशी सुसंवाद ठेवा. उपकेंद्राची रोहित्र क्षमता वाढविण्याचे व मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० तसेच इतर योजनेअंतर्गत उपकेंद्र रोहित्र वाढविण्याचे कामे प्राधान्याने पूर्ण करा. यंत्रणा अलर्ट मोडवर ठेवा, ग्राहकांचे मोबाईल क्रमांक अपडेट करुन घ्या. उपकेंद्राची रोहित्र क्षमता वाढविण्याचे कामे १० दिवसांत पूर्ण होतील यांची काळजी घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिल्या. तसेच दुरुस्तीचे कामे करताना महावितरणने ग्राहकांची गैरसोय होणार नाही यासाठी मॅसेज पाठवून पुर्वसूचना द्यावी. यामुळे ग्राहकांच्या तक्रारी वाढणार नाहीत. तसेच दुरुस्तीच्या कामासाठी अद्ययावत यंत्राचा वापर वाढवावा. यासाठी आवश्यक त्या साहित्यांची खरेदी करावी अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

नांदेड जिल्ह्यात १ हजार ७२५ गावे व ७२० वाडीपाडे असून या गावामध्ये महावितरणद्वारे विद्युतीकरण झालेले आहे. तसेच जिल्ह्यात एकूण ६ लाख २९ हजार १४७ विज ग्राहक आहेत. या सर्व ग्राहकांना उन्हाळयाच्या पार्श्वभूमीवर विज पुरवठा करताना विजेच्या मागणीनुसार पुरवठा कमी पडत आहे. त्यानुसार महावितरण विभागाकडून उपकेंद्राची रोहित्र क्षमता वाढविण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे ही समस्या लवकरच सुटण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याची माहिती महावितरणचे अधिक्षक अभियंता सुधाकर जाधव यांनी दिली. तसेच यावेळी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०, नवीन उपकेंद्रे मुख्यमंत्री सौर ऊर्जा वाहिनी योजना प्रणाली सुधारणा, नवीन अतिरिक्त उपकेंद्र रोहित्र मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० प्रणाली सुधारणा, एबीडी योजनेअंतर्गत्तच्या प्रस्तावित कामांची माहिती, नवीन उपकेंद्रे, सुधारित वितरण क्षेत्र योजना, वाहिनी विलगीकरण उपाययोजना, सोलार प्रकल्प यातील प्रगतीपथावर असलेल्या कामांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

# सोने-चांदी दरात वाढ

**मुंबई (प्रतिनिधी)–** गेल्या आठवड्यात घसरण झालेल्या सोने आणि चांदी दरात आता पुन्हा वाढ होताना दिसत आहे. सलग दुसऱ्या दिवशी सोने चांदी दरात मोठी वाढ झाली. यामुळे सोन्याचा तोळा पुन्हा एकदा जीएसटीसह लाखाच्यावर गेल्यामुळे खरेदीदरांची चिंता वाढली आहे.

मंगळवारी सोने १४०० रुपयांनी वाढून ९७, २०० रुपये तोळ्यावर (जीएसटीसह १,००,११६) पोहोचले. सोन्याने यंदा तिसऱ्यांदा एक लाखांचा टप्पा पार केला आहे. तर चांदीच्या दरात २ हजारांनी वाढ होऊन किलोमागे दर ९७,००० (जीएसटीसह ९९,९१०) वर पोहोचले. दरम्यान या आठवड्याच्या पहिल्या दिवशी सोने १८०० रुपयांनी वाढले होते. त्यानंतर १४०० रुपयांनी वाढले.

# राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा दौरा



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे रविवार, दि. ११ मे रोजी नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे राहील.

रविवार, दि. ११ मे २०२५ रोजी मुंबई येथून विमानाने सकाळी ९.१० वाजता श्री गुरूगोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन व मोटारीने प्रयाण. सकाळी ९.४५ वाजता माजी आमदार मोहनराव हंबर्डे यांच्या निवासस्थानी इंदिरा निवास काळेश्वर रोड विष्णुपूरी येथे आगमन व राखीव. मोटारीने सकाळी ११.१५ वाजता कै. मधुकरराव घाटे सहकारी सुतगिरणी मुखेड येथे आगमन व राखीव. मोटारीने दुपारी १२ वाजता मुखेड तालुक्यातील चव्हाणवाडी (बाऱ्हाळी) येथे आगमन व कार्यकर्ता मेळाव्यास उपस्थिती. दुपारी १.३० ते २.३० वाजेपर्यंत राखीव. दुपारी ३.१५ वाजता देगलूर येथे शहीद जवान कै. सचिन यादवराव वनंजे यांच्या घरी सात्वंनपर भेट. नंतर व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांच्या निवासस्थानी देगलूर येथे राखीव. सायं मोटारीने नांदेडकडे प्रयाण. सायं. ५.४० वाजता श्री गुरूगोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे आगमन व सायं. ५.४५ वाजता विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.

# उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत आज चव्हाणवाडी येथे पक्षप्रवेश सोहळा

**बाऱ्हाळी (सन्मुख मठदेवरू)–** मुखेड तालुक्यातील चव्हाणवाडी येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे ११ मे रोजी चव्हाणवाडी ता.मुखेड येथे येणार आहेत.त्यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील विविध पक्षांतील मान्यवर, नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करणार असल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा आयोजक स्वप्निल चव्हाण यांनी दिली.

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे, उच्च व तंत्र शिक्षण तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री इंद्रनील नाईक, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, महिला राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या प्रदेश अध्यक्ष रूपाली चाकणकर, माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे, शिक्षक आ. विक्रम काळे, आ. प्रताप पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीप धर्माधिकारी, माजी शिक्षण सभापती व्यंकटराव पाटील गोजेगावकर, माजी आ. अविनाश घाटे, रामदास पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार असल्याची माहितीही स्वप्नील चव्हाण यांनी दिली.

राज्यातील विरोधी पक्षातील काँग्रेससह शिवसेना ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाच्या पक्षातील नेते व कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करत असल्याचे सर्वत्र दिसत आहे. चव्हाणवाडी येथे सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या या जाहीर पक्षप्रवेश सोहळ्यात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत मोठ्या प्रमाणात पक्ष प्रवेश करणार आहेत. चव्हाणवाडी येथे पार पडणाऱ्या या सोहळ्याला जिल्ह्यातील इच्छुक नेत्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक स्वप्नील चव्हाण यांनी केले आहे.

# इथूनपुढे दहशतवादी हल्ल्याला युद्ध समजले जाईल!

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** दहशतवादाच्या संदर्भात भारताने मोठा निर्णय घेतला आहे. भविष्यातील कोणतेही दहशतवादी कृत्य युद्ध समजले जाईल. त्यानुसार त्याला चोख प्रत्युत्तर देऊ, असा इशारा भारताने पाकिस्तानला दिला आहे.

पाकिस्तानने शनिवारी पहाटे देशाच्या पश्चिम सीमेला लक्ष्य केले. त्यांनी भारताच्या लष्करी ठिकाणांवर हल्ला करण्यासाठी ड्रोन, लांब पल्ल्याची शस्त्रे, युद्धसामग्री आणि लढाऊ विमानांचा वापर केला. पण भारताने त्याला चोख प्रत्युत्तर देत त्याचे सर्व हल्ले यशस्वीरित्या परतवून लावले. या तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी पश्चिम सीमेवरील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीला संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान आणि तिन्ही दलांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. यापूर्वी, चौहान यांनी सिंह यांना सुरक्षेच्या परिस्थितीची माहिती दिली.

अमेरिकेच्या मध्यस्थीनंतर पाकिस्तान शस्त्रसंधीसाठी तयार झाला. दरम्यान या शस्त्रसंधीला स्वीकृती देताना भारताने महत्त्वाची अट टाकली. भविष्यातील कोणतेही दहशतवादी कृत्य युद्ध समजले जाईल. त्यानुसार त्याला चोख प्रत्युत्तर देऊ, असा इशारा भारताने पाकिस्तानला दिला आहे. त्यानुसार दोन्ही देशांमध्ये शनिवारी संध्याकाळी ५ वाजेपासून शस्त्रसंधी लागू करण्यात आली आहे.

# भारतीय सैन्य दलाच्या समर्थनार्थ आज शिवसेनेची तिरंगा रॅली




**नांदेड (प्रतिनिधी)–** पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय सैनिकांनी पाकिस्तानमध्ये घुसून दहशतवाद्यांना अद्दल घडवली आहे. पाकिस्तानच्या अनेक दहशतवादी तळांवर हल्ले करून दहशतवादी तळे उद्ध्वस्त करणाऱ्या भारतीय सैन्याच्या पराक्रमाला सलामी देण्यासाठी आज शिवसेनेच्यावतीने नांदेड शहरात तिरंगा रॅली दुचाकी रॅली काढण्यात येणार आहे. ना. हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आ. बालाजीराव कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर यांच्या नेतृत्वाखाली जुना मोंढा मैदान येथे सकाळी आठ वाजता रॅलीला सुरूवात होणार आहे.

पाकिस्तानच्या दहशतवाद्यांनी पहलगाम मध्ये केलेल्या आतंकी हल्ल्यात २६ पर्यटकांना आपला जीव गमवावा लागला होता. भारतात आतंकवादी हल्ला करून २६ पर्यटकांचा जीव घेणाऱ्या पाकिस्तानच्या दहशतवाद्यांना अद्दल घडवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्य दलाने मिशन सिंदूर राबवत पाकिस्तानमध्ये घुसून, धर्म विचारून गोळी मारणाऱ्यांना धर्म सांगून पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या चिंधड्या उडविल्या आहेत. शंभरहून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा करत भारतीय जवानाने दहशतवाद्यांची तळे उद्ध्वस्त केले आहेत. एवढेच नाही तर पाकिस्तान वाढून करण्यात येणाऱ्या प्रत्येक हल्ल्याला प्रत्युत्तर देत त्यांचे सर्व मनसुबे उधळून लावली जात आहेत. त्यामुळे भारतीय सैन्य दलाच्या या पराक्रमाला सलामी देण्यासाठी ना. हेमंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आ. बालाजीराव कल्याणकर, आ. आनंदराव बोंढारकर यांच्या नेतृत्वात आज दि.११ मे रोजी सकाळी आठ वाजता जुना मोंढा टावर येथून भव्य दुचाकी तिरंगा रॅली करण्यात येणार आहे. ही रॅली जुना मोंढा, महावीर चौक, कला मंदिर, शिवाजीनगर, आयटीआय, वर्कशॉपमार्गे राज कॉर्नर पर्यंत काढण्यात येणार आहे. आयोजित करण्यात आलेल्या तिरंगा रॅलीत सर्व राष्ट्रप्रेमी नागरिकांनी सहभागी व्हावे आणि आपल्या सैनिकांना पाठबळ द्यावे, असे आवाहन नांदेड जिल्हा शिवसेनेच्या वतीने करण्यात आले आहे.


दरम्यान रॅलीच्या तयारीच्या अनुषंगाने शासकीय विश्रामगृह येथे आ. बालाजीराव कल्याणकर, आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस संपर्कप्रमुख दत्तात्रय पइतवार, जिल्हाप्रमुख गंगाधर बडूरे, जिल्हाप्रमुख उमेश मुंडे, जिल्हाप्रमुख विनय गिरडे पाटील, शहरप्रमुख तुलजेस यादव, सुहास खराणे, संतोष माधनवाड, उमेश दिघे, विधानसभाप्रमुख अशोक उमरेकर, शंकर पिनोजी, गुरमितसिंघ टमना, तालुकाप्रमुख संतोष भारसावडे, उद्धव पाटील शिंदे, अशोक मोरे, आमोद साबळे, गणेश शिंदे, वनमाला राठोड, गिता पुरोहित, अवतारसिंघ पहरेदार यांच्यासह महिलाआघाडी व युवासेनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.



# एक होतं हऱ्यासपूर...

आटपाट नगर होत. नगराच नाव हऱ्यासपूर. ह्या गावात एक भलकसा चतूर अन् कावेबाज ईबलीस मानूस राह्ये. थ्याच नाव होतं हरिदास. नाव हरिदास पन् गुनं मातर राकेसाच्या पल्याळचे. हरिदास लांडग्यावानी बदमास होता. थो कुटका देवूनं भाकर घे. थे म्हनतात ना की, आवळा देवून कवळ घेनं बराबर तसा थो होता. बर घरचही कायी थो फकीर नोता. साजरा धलीधानी होता. बापजाद्यायचा वारसा हक्कानं भेटलेला टोलेबाज टोलेजंग वाळा, भरमसाठ जमिनजुमला, गोठ्यात गायी, म्हशी,बैलाच्या पाच जोळ्या, बकऱ्या, मेंढ्या थ्याले काहाचीच कमी नोती. फकस्त नोत थे वाघीनीचं दूध. बाकी सारं काही आलबेल होतं.

गावाचं नाव हऱ्यासपूर पन अवघ्या गावाले हऱ्यास आननारा होता हरिदास. हरिदासाले साजरी गोरीगोमटी बायको होती पन् नदीवरूनं पानी आननाऱ्या अन् वल्या झालेल्या बाया, नयतुरन्या पोरीले पाहूनं थ्याची लाय एखांद्या माजेल कुतऱ्यावानी गये. जौळच्या सोन्याले दूर फेकून ऊकंड्यात तोंड खुपसनाऱ्या डुकरावानी थो होता. पोरी भिजल्या की, तेयचा ऊभार थो निरखून पाह्ये. कपळे वले झाल्यानं कपळे आंगाले एकदम चिटकून बसत अन् थेच हा बदमास मानूस टक लावून डोये खोललेल्या एखांद्या पाखंडी मूनी सारखा वटारूनं पाह्ये. त्याले एक डोया नोता पन् त्याची नजर एखांद्या कावळ्यावानी धारदार अन् तेज होती. सोताच्या बायको जौळ पंधरा पंधरा दिवस जाये ना पन् दुसऱ्याच्या बायकापोरीले पाव्हल्या शिवा राह्ये ना. असा हा लबाळ लुच्चा अन् हरामखोर हरिदास होता.



एका रोजी हरिदासाच्या घरी गायगोंधनाच्या दिवशी मांग ढपळ वाजवत आला. एकदोन खळकू भेटन नाहीत दायीचा कयनाकोंडा भेटनं ह्या आशेनं थो डफळ वाजवत वाजवत हरिदासाच्या आंगनात आला. हरिदास बैकठीत बसूनं त्याचं वाजोनं आयकत होता. डफळ्याचा अवाज आयकत मजा घेत होता. मांगाचे हात दुखाले लागले थो थांबला. हरिदास कसा म्हनते. काय लेका बळीरामा थकलाही का बे. वाजोनं गळ्या आमासाक मजा येवून राह्यली मंग तुले देतो.

हरादासाचे बोल आयकूनं बळीराम हरिकला. जिवाच्या अकातानं थो वाजवाले लागला. डफळ वाजवून वाजवून थो घामाघूम झाला. हरिदास भौ द्या ना कयना कोंडा नाहीत मातेरं.

बळीराम हरिदासले बोल्ला.

हरिदास घरात गेला मूठभर जोंधय आनले अन् मांगाच्या झोईत टाकले. काय राजेहो हरिदास भौ मूठभर जोंधयात एक भाकर तरी होयनं काय. भूक तरी भागनं काय.

**वऱ्हाडी कथा**

मंग काय पोतभर देवू काय?

हरकिजान जेवळ देल्ल तेवळ घ्याव मानसानं. तुमी म्हतल म्हनूनच म्या आंगभर वाजोलं. अदलीभरत द्या बाप्पा.

म्या आवतन देल्ल होतं काय तुले माह्या आंगनात वाजवाले ये म्हनून.

बळीराम मांग मान खाली टाकूनं अस्तनीनं घाम पुसत अल्लादी अल्लादी दांडक डफळ्यावर मारत वाजवत वाजवत दुसऱ्या घरी यटायातल्या दुसऱ्या घरी चाल्ला जाते.

घागरी, मळके, ऊजयन्या, माठ बनवाले एका रोजी सदा कुंभार गध्यावरून माती घेवूनं घरी चाल्ला असते. रसत्यावरल्या बाभूयीच्या झाळाखाली बसून हरिदास पाह्यत असते. सात गधे एका रांगीत चाल्ले होते. ऊन भलकस आग वकत तपत होतं. काय सदाशिव कुठ्सा चाल्ला बावा भर ऊनात. घरी चाल्लो ब्वा माती घेवूनं. कुठून आनली. नदीवरूनं. बरं एक काम करन गळ्या. बोला ना ब्वा.

माह्या पायात साजरा खम्मन बाभूयीचा काटा गेला राज्या. चाल्ता ही येत नाही. तुमच्या गध्यावरूनं बसून सोळता काय घरी.' पन् गध्यावर त माती हाय.

माती घ्या तुमच्या डोक्शावर अन् मजबूत हट्ट्याकट्ट्या गध्यावर मी बसतो. एवळ काम करा ब्वा.

बरं बरं अस म्हनून सदाशिवन एक गध खाली केल. त्याच्यावर हरिदासाले बसोलं. सोता मातर डोक्शावर मातीची चुंबळी घेतली. हरिदासच्या मनात फुटाने फुटत होते. त्याच्या पायात काटा गेला नोता. आपल्या लबाळ बोलन्यानं लोकायले कस फसोत असा थो ईचार करत मनातल्या मनात राकेसी हासू हासत होता. सदाशिव चालूनं चालूनं घामाघूम झाला होता. गध वजनान तिरपा पाय टाकत चाल्ल होतं. चालनं थांबल की हरिदास टाचीनं गध्याच्या जीवघरावर सटकन् हाने. हरिदास गावात पोहचला अन् गध धप्पकन खाली पळ्ळ.

इतवार ऊजयला होता. इतवार हऱ्यासपूरचा बझार . हरिदासाचे केस वाहाळले होते. चला अज भादरून अन् केस कापूनं येवू असा ईचार करत थो माहाल्याजौळ गेला. पांडूरंग माहाली एका बुड्याची दाळी बनवत होता. हरिदास येतानी पाहूनं पांडूरंगान पाहूनं न पाह्यल्या सारख केलं. काय पांडुरंग बुवा कसा चालू हाय धंदा.

पोटभरो कारेकरम हाय आम्चा. तुमच्या सारखं सेठाचं काम हाय काय आम्च.

बरं केस कापून द्या. दाळी भादरूनं द्या बर साजरी. मांगच्या बारीनं केस बराबर नाही कापले ब्वा तुमी. याबारीनं जरा साजरे कापा. पांडुरंगाची ऊधारी हरिदास फेळत नोता. चार आने ऊधार होते. फुकटात भादरून अन् कापून जाये. म्हतल त म्हने मांडून ठुवा. मी काय पवून चाल्लो काय. असे ऊत्तर दे. पांडुरंग हरिदासले कटायला होता. बरं कटिंग दाळी भादरूनं घे अन् मसाजही करूनं घे बाकीचे गिऱ्हाईक तंगळत राह्येत. अज पांडुरंगन मनात पक्का ईचार केला होता. सायाच काहीही हो पन् आतापावतरचा सारा पैसा वसूल कराचा. हरिदास बसला साजरी कटिंग केली. दाळी भादराले घेतली अन् खस्कन अरधी मिशी ऊळोली. तसा हरिदासले बंबाट राग आला. थ्याचे डोये घळीभऱ्यातच लाल इंगोर झाले. अबे हे काय केल रे पांड्या.

आता घसरला हात गळ्या मी काय करू.


इतके साल झाले पन् तुवा हात असा कवा घसरला नाही अन् अजच कसा काय घसरला. एकत मले साईच्या लागनाले जाच हाय अन् त्वा असा अहिर केला बावा. आता काय करू. रावू द्या एवळीच मिसूर बरी वाटते. आपलीचं खेती हाय आठ दिवसात त येते.

अबे पन् लगन बस्तरवारी हाय ना गळ्या. बरं आता एक काम कर पुरीचं ऊळूनं दे गळ्या. अरधी साजरी वाटते काय. पत्ते सरले राजेहो. ऊद्या कापूनं देतो. अबे मॅटगीट झाला काय बे पांड्या पयले माह्यी सारी मिसूर भादर अन् मंगच त्वाली धोपटी ऊचल. पांडे ब्वा ईकळे तिकळे सफाचक रस्ता पाह्यते अन् धूम ठोकून पवूनं जाते. हरिदास दुपट्ट्यान तोंड झाकूनं घरी येते.

काय हो झालं बाई वानी तोंड लपवाले. हरिदासची बायको म्हनते. थो शेला जसा हटोते तशी थे खिदी खिदी हासाले लागते.

सु.पुं.अढाऊकर
अकोला.
९७६९२०२५९७

# स्त्रियांचे आत्मभान जागृत करणारा काव्यसंग्रह : उन्हं उतरणीला




**पुस्तक परीक्षण**

**प्रा. विठ्ठल बरसमवाड**
सदस्य- निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ अहिल्यानगर

महिला अनेक भुलथापांना सुरुवातीला बळी पडतात. नंतर त्या मूलभूत हक्कासाठी टाहो फोडत बसतात.बाई ही निर्जीव नसते. जीवनात आलेल्या दुःखाचे रणांगण तुडवत शब्दांचे आरास न मांडता अंगाराची पेरणी करत हा उन्हं उतरणीला काव्य संग्रह मार्गस्थ होतो. पाषाणाचे पुष्पात रूपांतर करण्याची ताकद बाळगून जीवनाकडे पाहण्याची कवयित्रीची दृष्टी सकारात्मक आहे. स्वतः स्वतंत्र प्रवाह निर्माण करणारा हा काव्यसंग्रह या ठिकाणी वाचकांना आम्ही उपलब्ध करुन देत आहोत.

झाड वेलींनी फुला-फळांनी कोणाच्या आश्रयाने जगावं, हा खडा सवाल त्या येथील व्यवस्थेला करतात. जगाच्या नकाशावर चांगली माणसं कुठं शोधावी हा जटिल प्रश्नांची उत्तरे शोधतात. पुरुषी अहंकारावर तुटून पडतानाही, पुरुषी हुंदक्याची व्यथा प्रकट करतात. त्यामुळे लेखिका डावखर अर्चना यांचा उन्हं उतरणीला हा काव्यसंग्रह खरोखरच वाखण्याजोगा आहे.या

काव्यसंग्रहास दिलेले शीर्षक महिलांचे आत्मभान जागृत करणारे आणि सूचक आहे. कवितेतील आशय मनाला विचार करायला लावणारा आहे. ही वेळच फार चमत्कारिक आहे.ना धड दिवस असतो,ना धड रात्र असते, सूर्यास्ताला जात असल्याची एक गहरी नैराश्य छटा या वेळेला असते, सूर्योदयाची प्रसन्नता, मध्यान वेळेची प्रखरता हाच सूर्य देत होता आणि उन्हं उतरणीच्या वेळेस सूर्य कसा मावळतो,त्यामुळे उन्हाची तीव्रता कमी झाली आहे. हे या कविता संग्रहातील वेगवेगळ्या कवितेतून आपल्याला अभ्यासता येते. सगळ्यांच्या घड्याळात वेळ जरी एकच असली तरी प्रत्येकाची वेळ वेगळी असते. खरोखर हा काव्य संग्रह आपल्या मनाला विचार करायला लावणारा आहे. काव्य संग्रहातील कविता समजून घ्यावेत. कवयित्री आयुष्याच्या ज्या टप्प्यावर आहेत तेथून त्या सगळीकडे तटस्थपणे पाहु शकतात. आपल्या जगण्याच्या भूत आणि वर्तमानाशी सांधेजोड त्या करू शकतात. बाईपणाच्या जवळ असणारे मानसिक पणाची ओढ असलेली ही खंबीर कवयित्री आहे. बायांचं दुःख या कवितेत कवयित्री सडेतोड पणाने म्हणतात.

बाया दुःख निखाऱ्यावर भाजतात. बाया दुःख पाणवठ्यांवर धुतात. बाया दुःख मुसळाने कांडतात. बाया दुःख जात्यावर दळतात. खरोखरच आजची स्त्री ही अबला नसून ती सबला झाली आहे.

तिचं दुःख ती किती ही मोठा निखारा असू द्या, त्यावरती भाजते आणि स्वाभिमानाने आपल्या पती बरोबर संसार करू शकते. ज्यावेळेस ती धुणं धुण्यासाठी जाते त्यावेळी धुणं धुते वेळेस तिच्या मनातले सुख -दुःख ती पाणवठ्यांवर धुऊन टाकते.

हातात मुसळ घेऊन येणाऱ्या अडीअडचणी धान्याला जसं कांडतात तसं ते व्यवस्थेला कांडते आणि सगळं दुःख गिळून जात्यावर आपल्या माहेरच्या ओव्या मन मोकळेपणाने गाऊन दळते. दररोज ती चुलीजवळ बसून स्वयंपाक करते.तिचे दुःख त्या चुलीत जाळते.बाया दुःख कागदावर लिहितात,तोपर्यंतचा संघर्ष मोठा विलक्षण आहे. स्त्रियांच्या आत्मभानाचा लढा एक रेषीय नाही, तर तो कितीतरी बहुपदरी, बहुस्पर्शी आणि बहुमितीयतेने वेढलेला आहे. वास्तवाच्या दाहक निखाऱ्यावर पायपोळ भोगून झालेला आहे.याची साक्ष देणारा हा काव्यसंग्रह आहे.

अशा प्रकारचा आशय मनाला प्रसन्न करणाऱ्या या काव्यसंग्रहात ५५ कविताआहेत. स्त्रियांनी शेतीचा शोध लावला, मानवी जीवनाला स्थैर्य मिळून दिले, सगळे भोग तिच्या वाट्याला आले आहेत.

कधी पुरुषाच्या मनात स्वामित्वाचा,मालकीचा भाव निर्माण झाला. तेव्हापासून ते आजच्या वर्तमान काळापर्यंत तिला दुय्यम पणाची वागणूक दिली होती .स्त्रीत अफाट शक्ती आहे, परंतु पुरुष वर्चस्ववादी मनोवृत्ती तिच्या जन्मापासून ते आजन्म तिला एकल ठेवण्या साठी प्रयत्नशील असते. एवढ्या शोषणाची तीव्रता असतानी ती आपलं दुःख कशा पद्धतीने सोडवते हे या ठिकाणी कवितेतून त्या सांगत आहेत, घर ,चूल आणि मूल या तिच्यातल्या मयेपोटी सृजनशीलतेची जाणीवच तिला होत नाही. रीतभात या कवितेत कवयित्री म्हणतात. माणसापेक्षा शब्दांनेच केली आजवर सोबत ....

अक्षराशी सूत जुळून घेतले, म्हणून निभावून नेता आले, ही बाईपणाची रीतभात मानवी जीवनातील स्त्री जीवना वर हक्क बजावते, कवयित्रीला आपली कविता आपलं लिहिणं हा जगण्याचा आधार आहे,मानवी जीवनातील स्त्री जीवन हा खरंतर चिंतेचा आणि चिंतनाचा विषय आहे. पुरुषसत्ताक जुलूमाचे दोर जरा सैल जरी झाले असले तरी काही अदृश्य शृंखला आजही स्त्री जीवनाला काचत असतात. म्हणूनच बाई पणाची रीतभात कशी निभावली हे कवयित्रीला सांगावे लागते. पुरुष स्त्रीकडे माणूस म्हणून एक स्वतंत्र अस्तित्व म्हणून कधी पाहणार आहेत. हा प्रश्न सतत तिला सलत राहणारा आहे .गुंठा आणि घर या कवितेच्या शेवटच्या ओळी आहेत, एक दिवस तू अचानक गेला. तेव्हा मी पुन्हा बेघर झाले होते. स्त्रीच्या जीवनात लग्नरुपी किंवा एक सहचर शोधाच्या निमित्ताने एक विस्थापन येते, ती आपली जडणघडण आपले अभिरुची सगळ्यांशी तडजोड करत आपली पानं -मुळं पुन्हा एका वेगळ्या घरात रुजू पाहते.सुदैवाने समंजस ,सुयोग्य असा सहचर मिळाला तर ठीक अन्यथा फार दोलायमान स्थिती स्त्रीच्या आयुष्याची होत राहते, आयुष्य नावाची गोष्ट कोणाच्याच हातात राहत नाही. आपल्या प्राणप्रिय व्यक्तीचं असं अर्धा डाव सोडून अकाली जाणं, दुःखाच्या खोल गर्तेत. कडेलोड करणारे असते.आपण सोबतीने आयुष्याचे जगण्याचे स्वप्न पाहिलेले असतात. त्या सगळ्या स्वप्नभंगाची दुःख सहन करावे लागते.सांगता येत नाही या कवितेतील या ओळी कवयित्री स्वतःच्या दुःखाची दाहकता कमी करण्याचे मार्ग स्वतः शोधत आहे. निसर्गाच्या कुशीत गेले पाहिजे. आपल्या अंगणात गाणारे पारिजातक लावले पाहिजेत.असे तिला वाटते. गोंदण कवितेतील खालील ओळी आहेत. तो विसरून गेला होता बहुतेक, बाप नावाची रिकामी जागा भरायला. त्यानंतर कित्येक दिवस उजळ माथ्याने मिरवत राहिले .

शेवटपर्यंत पांढऱ्याफटक कपाळावर हिरवेगार गोंदण की, ते कोरुन ठेवले होते. असे मनाला वेदना देणारी ही कविता आहे. कवयित्री अर्चना डावकर यांच्या उन्हं उतरणीला हा काव्यसंग्रह अंतर्मुख होऊन स्वतःच्या मनाला विचार करायला लावतो. माणसातल्या एकटेपणाची एकटेपणातून येणाऱ्या दुःखाची त्या दुःखातून येणाऱ्या शहाणीवतेची आणि स्त्री पुरुष या भेदा पलीकडे असणाऱ्या माणूसपणाच्या आस्थेची वीण अधिक घट्ट करणारी आहे. आपण आजन्म केवळ एकटे असतो.एकल स्त्री, एकलमाता म्हणून जगत असताना, नात्यातील , किंवा काम करतो तेथील, आणि समाजातील माणसाच्या वागणीतून आलेले अनुभवामुळे अर्चना डावखर या निसर्गाच्या सानिध्यात स्वतःला झोकून घेतात.नदी् झाड,फुल,शेती आणि त्यात रमणं त्यांना प्रिय वाटते. उन्हं उतरणीला हा काव्यसंग्रह सशक्त,समृद्ध आणि वास्तविकेशी दोन हात करणारा आहे. परसात उतरणारे पक्षी, परागंदा झालेला बगळ्यांचा पांढरा शुभ्र थवा, माणसाने शिवलेल्या चिमणीच्या पिल्लूयावर इतर चिमण्यांनी टाकलेला बहिष्कार, बारमाही दुधडी भरून वाहण्याच्या प्रवरेने सोडलेला रितीरिवाज, कपाळावर लाल ठिपका आणि गळ्यात चार काळे मणी बांधून विकत घेतलेला स्त्रीत्व,एखाद्या भुरट्यासाठी गावची वेस ओलांडून गहाण ठेवलेला स्वतःचा अधिकार , स्त्रीच्या देहाला जशी किंमत असते तशी मनालाही नसते हे नाकारणारी येथील व्यवस्था आणि घराचा एखादा कोपरा हक्काचा नसल्याचं उपरेपण कवियत्री अर्चना डावखर यांनी या काव्यसंग्रहातून व्याकुळतेने मांडलेल्या आहेत.

**उन्हं उतरणीला (काव्यसंग्रह)**
**प्रकाशक:** संजय जयप्रकाश सुरनर
संगत प्रकाशन, विवेक नगर, -५ नांदेड.
**मुखपृष्ठ :** संतोष घोगडे, पुणे
अक्षर जुळणी : सौफ कलावती घोडके, नांदेड
**प्रथम आवृत्ती :**११ डिसेंबर २०२४
**मुद्रक:** प्रिंटर्स, हैदराबाद
**अर्चना डावखर**
**स्वागत मूल्य:** २८० रुपये
**लेखिका:** औदार्य निवास मु. पो. बोधेगाव
ता. शेवगाव, पीन-४१४५०३

# प्रेम व निस्वार्थ मायेचा वटवृक्ष म्हणजेच माय!

आईचा मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी मे महिन्याच्या दुसऱ्या रविवारला मातृदिन साजरा केला जातो. त्या अनुषंगाने यावर्षी मातृदिन ११ मे २०२५ रविवारला येत आहे. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परीभाषांशी किती जवळचं आणि रक्ताच नातं असते हे आपल्याला आई-वडील या शब्दावरूनच सहज समजून येते. या जगात मायबापाशिवाय कोणीही मोठा नाही. आईवडील, माय-बाप या शब्दाला सुध्दा कुठेही तोड नाही. कारण आई-वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी व जीवजंतू या शब्दाशी निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती, संस्कार, संस्कृती, जडणघडण, रहनसहन सर्वत्र दिसून येते.

ज्याप्रमाणे आई-वडील मुलांची जोपासना करतात. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची (मुलांची) जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात. ही ईश्वरी देणच आहे. त्यामुळे या जगात आईवडिलांपेक्षा कोणीही मोठा नाही हेही तितकेच सत्य आहे.कारण वडिलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते. त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो. त्यामुळे आई-वडिलांची भूमिका समान असते. आई नेहमी मायेचं पांघरूण घालत असते तर वडील पहाडासारखा संपूर्ण कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भूमिका निभवत असतो. सर्वांनीच आई-वडिलांची सेवा व सन्मान करायला हवा. आईचा मानसन्मान करून पितृ दिवस हा तर दररोज साजरा करायला पाहिजे. परंतु जगाला जान रहावी म्हणून ठराविक दिवशी मातृदिनाला महत्व आहे

पितृ दिन असो किंवा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात. यात यत्किंचितही



फरक नाही. फक्त जबाबदाऱ्या वेगवेगळ्या असतात त्यामुळे मुले-मुली यांच्या केसालाही धक्का लागणार नाही याची काळजी नेहमी घेऊन तत्परता दाखवित असतात. कारण मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे. त्यामुळे सर्वप्रथम मातृदिनाची सुरूवात १९०८ साली अमेरिकेतून झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली व अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखांमध्ये मतभेद आहेत. मातृत्व दिन (मदर डे) प्रमाणेच वडिलांचा आदर, सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन (फादर डे) साजरा केला जातो.

जगात आई-वडील या शब्दाला सुध्दा तोड नाही. कारण जगातील कोणतीही भाषा असो मामा-मामी, काका-काकु, माऊशी, आत्या इत्यादी अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळी शब्दप्रयोग सुध्दा आहेत. परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा, तुम्हाला आई-वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल. उदाहरण द्यायचे झाले तर आई-बाबा, मम्मी-पप्पा अशाप्रकारे जगात एकच शब्द आपल्याला आई-वडिलांसाठी दिसून येईल ही एक सृष्टीची लिलाच म्हणावी लागेल. मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळ्या नात्यातील एक नातं म्हणजे आई-वडिलांचं नातं. वडिलांच आणि मुलांचे नाते म्हणजे समुद्रातील पाण्यासारखं अफाट असते. कारण प्रत्येक आई मुलांना घडवीते सुसंस्कृत करते पदोपदी मुलांची काळजी घेते यातच मातृत्व दडलेले दिसून येते. कारण आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते. त्यामुळे आपले मुल काय करीत आहे आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची सटीक चाहूल आईला कळत-नकळत कळते व त्यापद्धतीने मुलांचे संगोपन करीत असते. आई अशी दैवी शक्ती आहे की आकाश पाताळ एक करते. परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही. आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यावरच जेवण करीत असते. आई-वडिलांचं नातं या भुतलावर अफाट असून न-भूतो-न-भविष्यती अशाप्रकारचे हे नाते आहे. कारण वडील भूक-तहान विसरून आपल्या कुटुंबाकरिता राबत असतो व घरगृहस्ती चालवीतो. म्हणजेच घराला आर्थिक बळ देण्याचे काम वडील करीत असतात तर वडिलांनी केलेल्या कमाईच्या आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते. कारण मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते. म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तीची मोठी कसोटीची परीक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तृत्वाला कोणीही मात करू शकत नाही. म्हणून सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की, आपले खरे गुरु व दैवत आई-वडीलच आहेत त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई-वडिलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे. आई या शब्दाला किती महत्त्व आहे हे आपण या ओवीवरून समजू शकतो. आई माझा गुरु,आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे आईविना जग नाही व वडीलांविन आधार नाही.

आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाण्याचा मोठा करते. त्यामुळे आज सर्वांचीच प्रथम जबाबदारी आहे की आपल्या आई-वडिलांची सेवा करने,पालनपोषण करणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व त्यांच्या वेदना जाणुन घेऊन त्यांवर उपाययोजना करणे आणि आई-वडीलांना सुखी व समाधानी ठेवणे यातच आपल्याला खरा जागतिक मातृदिन दीसुन येईल.माझ्यामते मातृदिन ठराविक दिवशीच का साजरा करावा.दररोज साजरा का करू नये? मी तर म्हणेन की मातृत्व-पितृत्व दिवस हा दररोज आई-वडीलांची सेवा करून साजरा केला पाहिजे व आपण ते दिवस आठवायला पाहिजे की आपल्याला लहाण्याचे मोठे करण्यासाठी आईने कीती यातना व दु:ख सहन केले असावे.याची जाणीव आज मुलांनी ठेवण्याची गरज आहे.कारण आईने आपल्याला वटवृक्षाच्या छायेत लहाण्याचे मोठे केले व याच वटवृक्षाचा पहारेकरी म्हणून वडिलांनी आपली चोख भुमिका बजावली. आई-वडीलच्या तत्परतेमुळेच मुलांच्या केसालाही धक्का लागत नाही ही दैवी शक्तीच म्हणावी लागेल.मातृदिनाच्या निमित्ताने मी सर्वांना हेच सांगु इच्छितो की आपण सर्वांनी भारतीय संस्कृतीच जपायला हवी यातुनच आपल्याला खऱ्या अर्थाने आई-वडीलांची सेवा करता येईल.पाश्चिमात्य देशात आई-वडील सोडून इतर नातेसंबंध अंकल व टी या दोन शब्दात संपुष्टात आली आहे.परंतु भारतीय संस्कृतीत आजी, आजोबा,काका, काकु,मामा,मामी, मावशी,आत्या इत्यादी अनेक वेगवेगळे शब्द आपल्याला वेगवेगळ्या नात्यांप्रमाणे दिसून येतात त्यांचा सन्मान व्हायलाच पाहिजे.त्यामुळे अंकल-न्टी हे पाश्चिमात्य शब्द विसरायला हवे.त्याचबरोबल मम्मी-पप्पा या शब्दांना पुर्णविराम देऊन आई-बाबा असे शब्द ऐकू आले तर भारतीय संस्कृतीचा सन्मानच अवश्य होईल असे मला वाटते. सध्याच्या काळात काही मुल-मुली आई-वडिलांची सेवा करण्यास असमर्थ दिसून येतात अशा परिस्थितीत आई-वडिलांना वृध्दाश्रमाच्या खाईत लोटतात हेही आई-वडिलांच्या प्रती दुर्भाग्यच म्हणावे लागेल. परंतु असे व्हायला नको असे मला वाटते. आपण ११ मे ला मातृदिन (मदर्स डे) साजरा करीत असतांना पृथ्वी मातेचाही थोडासा विचार करायला हवा.कारण आज पृथ्वीची जोपासना होत नसल्याने दिवसेंदिवस हवामनात बदल होत आहे.याकरीता जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून प्रत्येक मुलांनी आई-वडीलांच्या आठवणीत रहावे यासाठी आजच्या दिवशी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येईल.यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल व आई-वडीलांना निसर्गाचा आनंद घेता येईल.जय हिंद.

**-रमेश कृष्णराव लांजेवार**
नागपूर
मो.९९२१६९०७७९

## दिसायला नको,

असायला हवे,
जगणे गुणवत्तेचे
मिश्रण, व्हायला हवे.

दाखवायला नको,
करायला हवे,
प्रेम जगण्यातले,
वाढायला हवे.

वाचायला नको,
अनुभवायला हवे,
संघर्ष जगण्यातील,
स्वीकारायला हवे.

बोलणे नको,
कार्य व्हायला हवे,
जगणे कृतीमय
व्हायला हवे.

स्वप्न नको,
वास्तव हवे,
यश कल्पनेतले,
सत्यात उतरायला हवे.

**-प्रा. अमित शिंदे.**
नांदेड.
मो. ९७६७८५१०४६

## थोडक्यात...

### प्रतीक सोनवणे एम.एस. मास्टर्स पदवीने सन्मानित

**नांदेड (प्रतिनिधी)** – । नांदेड येथील प्रतीक संजयकुमार सोनवणे याने अमेरिकेतील युनिव्हर्सिटी



ऑफ टेक्सॉस अॅट अर्लिग्टंन येथून एम. एस. डिग्री (इंजिनिअरींग) पूर्ण केली. तेथील विद्यापीठाचे मान्यवर पदाधिकारी तसेच प्राध्यापकांच्या हस्ते प्रतीक सोनवणे याला पदवी प्रदान करून सन्मानित करण्यात आले. प्रतीकचे प्राथमिक शिक्षण नागार्जुना पब्लिक स्कूलमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस महाविद्यालयातून इयत्ता बारावी तसेच इजिनिअरींगची पदवी एम.जी.एम. महाविद्यालय नांदेड येथून घेतली आहे. या यशाबद्दल प्रतीक सोनवणे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन व कौतूक होत आहे. प्रतीक सोनवणे हे नांदेड मर्चन्टस् को-ऑप. बँकेतील संजयकुमार सोनवणे यांचा मुलगा आहे.

### तेरा गोवंशाची केली सुटका; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)**– हदगाव पोलिसांनी नाकाबंदी दरम्यान कत्तलीसाठी जाणारे १३ गोवंश पकडले. तसेच वाहन जप्त करून गोवंश गोशाळेत जमा केले आहे. ही कारवाई नऊ मे रोजी सकाळी सहाच्या सुमारास करण्यात आली. हदगाव ते तामसा रस्त्यावर हदगाव पोलिसांनी नाकाबंदीत पिकप वाहन (एमएच २७ बी डब्ल्यू ५५ १३ ) मधून १३ गोवंशाची सुटका केली. पोलीस उपनिरीक्षक राजेश नंद यांच्या फिर्यादीवरून शेख नसीर शेख सगीर आणि शेख इकबाल या दोघांविरुद्ध हदगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक रायबोले करत आहेत.

# मान्सूमपूर्व कामे यंत्रणांनी वेळेत पूर्ण करावी -जिल्हाधिकारी

**नांदेड (प्रतिनिधी)** – मान्सूम काळात उद्भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी संबंधित यंत्रणांच्या विभाग प्रमुखांनी योग्य ती खबरदारी घेऊन मान्सूम पूर्व कामे वेळेच्या आत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी दिले. नांदेड जिल्ह्यात गोदावरी नदी आणि इतर लहान-मोठ्या नद्या लक्षात घेता जवळपास ३३७ गावांना पुराचा धोका उद्‌वू शकतो. जिल्ह्यात आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाली तर त्या-त्या भागातून सुरक्षिततेच्या उपाययोजना योग्य पद्धतीने जिल्हा प्रशासनाला हाताळता याव्यात यादृष्टिने सर्व यंत्रणानी दक्षता घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.



मान्सून २०२५ च्या अनुषंगाने पूर्वतयारी आढावा बैठक जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात शनिवारी संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस मनपा आयुक्त महेशकुमार डोईफोडे, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा पुरवठा अधिकारी रुपाली चौगुले, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी कुन्हे यांच्यासह परिवहन, सार्वजनिक बांधकाम, पाटबंधारे, महानगरपालिका, आरोग्य, कृषि, महसूल विभाग, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मृद व जलसंधारण, विद्युत, पोलीस, अग्निशमन, शिक्षण, पशुसंवर्धन, रेल्वे आदी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पावसाळयात उद्भवणाऱ्या विविध आपत्तींना तोंड देण्यासाठी आणि सावधगिरीच्या उपाययोजनांचा आढावा घेऊन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले म्हणाले, जिल्ह्यात ३३७ गावे पूरग्रस्त आहेत. या गावात रंगीत तालीम घ्याव्यात. आपत्कालीन परिस्थितीवर मात करण्यासाठी सर्व यंत्रणाची आवश्यक साहित्यांची खरेदी करावी. २४ तास नियंत्रण कक्षाची स्थापना करुन कक्षातील कर्मचाऱ्यांचे मोबाईल क्रमांक अद्यावत करावेत. आरोग्य विभागाने वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी मुख्यालयी उपस्थित राहतील यांचे नियोजन करावे. आदिवासी व ग्रामीण भागात सर्पदंशासह इतर आजारांवरील उपचार स्थानिक ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रातच करावेत. रुग्णाला औषध उपचारासाठी इतरत्र जाण्याची गरज भासू नये. आरोग्याच्या सुविधा देण्यासाठी आरोग्य पथकांची नियुक्ती करावी. पावसाळयात उत्पन्न होणाऱ्या साथीच्या रोगराईंना थांबविण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात मुबलकपणे औषधी, रक्तसाठा इतर अनुषंगिक साहित्य उपलब्ध करावीत. ब्लिचिंग पावडरची साठवणुक सुरक्षितपणे ठेवून त्याचा योग्य उपयोग करावा, असेही निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आरोग्य विभागाला दिले.

शहरातील नाल्याची स्वच्छता करुन घ्यावी. गावांना धोका होऊ नये यादृष्टीने पाझर तलावाची दुरुस्ती करुन गाळ काढावा. शहरातील धोकादायक इमारतीची पाहणी करुन नोटीस देवून नियमानुसार कारवाई करावी. पुर परिस्थितीत नदी काठच्या लोकांचे स्थलांतर करण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी. सुरक्षित स्थळे निश्चित करावीत. तसेच महावितरण, जिल्हा पुरवठा कार्यालय, शिक्षण विभाग, पशुसंवर्धण विभाग, कृषि विभाग यांनाही आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याबाबत सूचना दिल्या.

सर्व प्रमुख यंत्रणांनी या मान्सून कालावधीत नियंत्रण कक्ष २४ तास कार्यरत ठेवावीत. पाटबंधारे विभागाने गोदावरी व इतर नदीच्या पाणी पातळीचा धोका, इशारा पातळीबाबत उपाययोजना करतांना सर्व विभागांशी समन्वय ठेवून धरणनिहाय समन्वय अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी तालुकास्त्रावर मान्सुन पूर्व तयारीची आढावा बैठक घेवून पूर परिस्थिती प्रतिबंधक कामे मान्सून पूर्वी करावीत. आपत्कालिन नियंत्रण कक्षातील शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचे मोबाईल संपर्क अद्यावत करावीत. वाहन व्यवस्था सुस्थितीत ठेवावी. विजपातामुळे होणारे मृत्यू कमी करण्यासाठी जनजागृती आणि बचाव कार्याचे रंगीत प्रशिक्षण पूर्ण करावेत. नगरपालिका प्रशासनाने शहरातील नाली साफसफाईचे कामकाज युध्द् पातळीवर करावेत. आपत्ती निवारणाची कामे सक्षमपणे पार पाडावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी दिले. निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी जिल्ह्यात आपत्ती व्यवस्थापनाबाबत करावयाच्या उपाययोजनांची माहिती दिली.

# दिल्लीमध्ये तिसऱ्यांदा साजरा होणार छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय जन्मोत्सव

## इंजि. तानाजी हुस्सेकर यांची माहिती

**नांदेड (प्रतिनिधी)**– छावा मराठा संघटनेतर्फे दिल्लीमध्ये २०२३ पासून सुरू झालेला छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय जयंती महोत्सव यंदा तिसऱ्या वर्षात पदार्पण करत आहे. छत्रपती संभाजी महाराज राष्ट्रीय जयंती व सांस्कृतिक संचालनालय महाराष्ट्र सरकार यांच्या संयुक्त विद्यमानाने कार्यक्रम दिल्लीत साजरा होणार आहे.



कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे पाटील हे असतील. केंद्रीय राज्यमंत्री (आयुष मंत्रालय, स्वतंत्र प्रभार) प्रतापराव जाधव हे कार्यक्रमाचे उद्‌घाटक असतील. जलशक्ती मंत्रालयाचे केंद्रीय मंत्री सी.आर. पाटील आणि नागरी विमान वाहतूक व सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमंत राजे भोसले (नागपूर संस्थान), माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, डॉ. सुरेश चव्हाणके, आचार्य श्रीजामोदेकर बाबा, राजे शिवाजीराव जाधवराव, डॉ. भागवत कराड, खासदार नागेश पाटील आष्टीकर, खासदार संदिपान भुमरे,खासदार राजाभाऊ वाजे, खासदार भास्कर भगरे, खासदार अजित खोपछडे, खासदार रविंद्र चव्हाण हे उपस्थित राहणार आहेत.

सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत प्रा. राजेश सरकटे यांचा 'गर्जा महाराष्ट्र' कार्यक्रम सादर होईल. याशिवाय प्रा. डॉ. प्रभाकर जाधव लिखित 'मराठा टुरिझम' या पुस्तकाचे प्रकाशनही मान्यवरांच्या हस्ते होणार आहे.

प्रा. रवींद्र बनसोड यांचे व्याख्यान होणार असून या सोहळ्याद्वारे छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, विचार आणि कार्य देशभर पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याची माहिती कार्याध्यक्ष इंजि. तानाजी हुस्सेकर यांनी यांनी दिली आहे. तसेच यूपीएससी परीक्षेत महाराष्ट्रातील मुलांनी उत्कृष्ट यश मिळवले आहे. त्यांचा सत्कारही करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष इंजि. तानाजी हुस्सेकर, जिल्हाध्यक्ष इंजि. प्रवीण जाधव आणि प्रवक्ते प्रा. डॉ. प्रभाकर जाधव यांनी केले आहे.

# जिल्ह्यांत तीन ठिकाणी घरफोडीच्या घटना तर हदगावमध्ये चोरी

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्ह्यात हिमायतनगर, किनवट आणि मनाठा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घरफोडीच्या घटना तर हदगावमध्ये चोरीची घटना उघडकीस आली आहे. या घटनांमध्ये जवळपास साडेआठ लाखांहून अधिक रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला आहे.

पार्डी जे. येथील सुनिल तुकाराम घागरे यांचे घर ९ मेच्या मध्यरात्रीनंतर फोडून कपाटातील सोन्या-चांदीचे दागिणे किंमत १ लाख २८ हजार रुपयांचे आणि रोख रक्कम ४ हजार रुपये असा १ लाख ३२ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे. हिमायतनगर पोलिसात या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरिक्षक पाटील अधिक तपास करीत आहेत.

बोधडी ता. किनवट येथील प्रशांत गंगाधर सिरमवार यांचे राजेश्वर वेअर हाऊस ७ मे रोजी फोडून चोरट्यांनी १३० ते १४० सोयाबिनचे कट्टे किंमत ३ लाख ५० हजार ते ४ लाख असा ऐवज चोरून नेला आहे. किनवट पोलीसांनी गुन्हा दाखल आहे. पोलीस अंमलदार वाघमारे अधिक तपास करीत आहेत.

मनाठा येथील शिवाजी नागोराव कनके यांचे मनाठा पाटीजवळील बिअर बार दि. ७ मे रोजी रात्री चोरट्यांनी विदेशी दारु आणि सीसीटीव्हीचा डीव्हीआर असा ५८ हजार ४०० रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. मनाठा पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस अंमलदार यादव अधिक तपास करीत आहेत.

८ मे रात्री निवघा बाजार येथील विज वितरण कंपनीच्या ३३ केव्ही कार्यालयात ठेवलेले ९६० किलो अॅल्युमिनियएम वायर (किंमत ३ लाख रुपये) हे साहित्य अज्ञात चोरट्यांनी चोरले आहे. वीज वितरण कंपनीत सहगुत्तेदार गजानन शंकरराव जामगडे यांच्या तक्रारीवरून मनाठा पोलीसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पोलीस उपनिरिक्षक नंद अधिक तपास करीत आहेत.

# लेंडी धरणाचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल भास्करराव पाटील खतगावकर यांनी मानले अजित पवार यांच्यासह महायुती सरकारचे आभार

**नांदेड (प्रतिनिधी)**– मुखेड व देगलूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा व नागरिकांचा जिव्हाळ्याचा लेंडी (आंतरराज्य प्रकल्प) धरणाचा प्रश्न गेल्या ३९ वर्षापासून प्रलंबित होता. येथील पुनर्वसनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे लेंडी धरणाचा प्रश्न मार्गी लागल्याचा मला मनस्वी आनंद असून लेंडी धरणाचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे माजी मंत्री तथा माजी खासदार भास्कर आपले खतगावकर यांनी जाहीर येथे आभार मानले आहेत.

ते म्हणाले की, देगलूर-मुखेड विधानसभा मतदारसंघातील कृषी सिंचनाचा प्रश्न मार्गी लागावा, यासाठी तब्बल ३९ वर्षांपूर्वी मी आमदार असताना शासन दरबारी पाठपुरावा केला. शंकरराव चव्हाण यांच्या हस्ते सन १९८६ मध्ये भूमिपूजन झाले होते. महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे व आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्या उपस्थितीत करारही झाला होता. पुनर्वसनाचा प्रश्न सुटला नसल्याने कामाला विलंब होत राहिला. लेंडी धरणाचे काम माझ्या हयातीमध्ये पूर्ण व्हावे हे माझे स्वप्न होते, ते काम आता पूर्ण होत आहे, याचा मला मनस्वी आनंद आहे. तसेच रखडलेल्या लेंडी आंतरराज्य प्रकल्पाच्या घळभरणी कामाचाही शुभारंभ झाला आहे. लेंडी धरणामुळे



देगलूर व मुखेड तालुक्यातील ४० हजार एकर जमिनीला पाणी मिळणार असून या भागातील शेतकरी सुजलाम सुफलाम होणार आहे. जोपर्यंत कृषी सिंचनाचा प्रश्न मार्गी लागत नाही. तोपर्यंत खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना अच्छे दिवस येणार नाहीत, असे माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर म्हणाले.

अखेर ३९ वर्षानंतर लेंडी धरणाचा प्रश्न मार्गी लागला आहे. कृषी सिंचनासोबतच या भागातील शेकडो गावातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही कायमचा सुटणार आहे, असे सांगून माजी मंत्री तथा माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी लेंडी धरणाचा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, मुखेड विधानसभा मतदारसंघाचे आ. तुषार राठोड यांचे जाहीर आभार मानले आहेत.

# नरसीत आज श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त भव्य शोभायात्रा

**नरसी (प्रतिनिधी)**– नरसीत प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी दि.११ मे रोजी श्रीराम जन्मोत्सव सोहळा व शोभायात्रा काढण्यात येणार आहे. श्रीराम जन्मोत्सव सोहळा जुने गावातून दुपारी दोन वाजता मुख्य मंदिरातून निघणार असुन यात मुख्य आकर्षक भव्य श्री राम मूर्ती श्री हनुमान मूर्ती महादेव नंदी बाहुबली हनुमान महाकाल महादेव लाइटिंग अघोरी असे देखावे असणार आहेत.

या शोभायात्रेच्या मार्गावर जागोजागी थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मठ्ठ्याचे वाटप, खिचडी वाटप करण्यात येणार आहे. प्रमुख वक्ते म्हणून गुरुवर्य श्री ष. ब्रा.प्र. १०८ डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज गणाचार्य मठसंस्थान मुखेड हे उपस्थित राहणार आहेत.

पारंपारिक पद्धतीने भजनी आपले वस्त्र परिधान करून गोसावी वासुदेव साधू संत, महंत किर्तनकार, प्रवचनकार, टाळकरी, माळकरींसह हजारो राम भक्त शोभायात्रेत सहभागी राहणार आहेत.

श्रीराम मंदिरात श्रीरामाचा अभिषेक पूजा आरती करून शोभायात्रेला सुरुवात होईल. ही शोभायात्रा मुख्य चौकातून श्रीराम मंदिर येथे आरती नंतर संपन्न होईल. या कार्यक्रमाला हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीराम जन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने करण्यात आले आहे

# आज दाभड येथे मंगल परिणय सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)**– शांतीदूत प्रतिष्ठान नांदेडच्या वतीने दि. ११ मे रोजी दुपारी १२-३० वाजता महाविहार बावरीनगर, दाभड येथे १६ वा सामूहिक मंगल परिणय सोहळा संपन्न होणार आहेत. या सोहळ्यात एकूण १३ जोडपे विवाहबद्ध होणार आहेत.

पू.भ. डॉ. उपगुप्तजी महाथेरो कार्याध्यक्ष अ.भा. भिक्ख्यू संघ, प्रा.डॉ. खेमोधम्मो महाथेरो, प्रा.डॉ. एम. सत्यपाल महाथेरो, अश्वजीत थेरो, शिलरत्न थेरो, रेवतबोधी, बुद्धभूषण यांच्या हस्ते संपन्न होणार असून या सोहळ्यास महाउपाध्यक्ष डॉ.एस.पी. गायकवाड, अतिरिक्त जिल्हाधिकारी पी.एस. बोरगावकर, सेनि. अति. जिल्हाधिकारी बी.एम. कांबळे, आंबेडकरी नेते सुरेश गायकवाड, आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम, समाजकल्याणचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे, सेनि. बीएसएनएलचे महाव्यवस्थापक आर.बी. मादळे, सेनि. अधिक्षक अभियंता व्ही.आर. भुरे, सेनि. डीवायएसपी विजय डोंगरे, तहसीलदार अर्धापूर रेणुकादास देवणीकर, बीडीओ दत्तात्रय कदम, पीआय अर्धापूर चंद्रशेखर कदम आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# जप्त व बेवारस गाड्या मूळ मालकांनी कागदपत्रं दाखवून घेऊन जाव्यात -पो. नि. चिंचोलकर

**नांदेड (प्रतिनिधी)** – पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापडलेल्या, अपघातग्रस्त, बेवारस व वेगवेगळ्या गुन्ह्यात जप्त केलेल्या दुचाकी गाड्या संबंधित मूळ मालकांनी कागदपत्रं दाखवून घेऊन जाव्यात, असे आवाहन नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी केले आहे.

नांदेड शहर व ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत विविध गुन्ह्यातील जप्त केलेल्या तसेच अपघातातील दुचाकी गाड्या व अन्य वाहने बेवारस म्हणून लावण्यात आलेले आहेत. त्या गाड्यांच्या मालकी हक्काची ओळख पटवून घेऊन जाव्यात. वृत्त प्रकाशित झाल्यानंतरही मूळ मालक आले नाही तर संबंधित गाड्यावर कोणाचाच मालकी हक्क नसल्याचे समजून लवकरच कायदेशीर लिलाव प्रक्रिया करण्यात येणार असल्याचे चिंचोलकर यांनी सांगितले आहे.

संबंधित जप्त केलेल्या गाड्या नांदेड ग्रामीण ठाण्याच्या मुख्य प्रवेशद्वारावर लावण्यात आल्या आहेत. त्या गाड्यांची कागदपत्र दाखवून मालकांनी घेऊन जाव्यात असेही वाहनधारकांना आवाहन केले आहे.

# सिडको क्षेत्रीय कार्यालय क्षेत्रातील १ हजार २६५ थकबाकी मालमत्ताधारकांना लोक अदालत नोटीसीचे वाटप

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – महापालिकेच्या सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत लोक अदालत अनुषंगाने जवळपास १ हजार २६५ थकीत मालमत्ता धारकांना नोटीस बजावण्यात आली आहे. कर निरीक्षक, वसुली लिपीक यांच्या माध्यमातून ह्या नोटीसा देण्यात आल्या आहेत. मालमत्ता धारकांनी मालमत्ता कर भरून सहकार्य करावे, असे आवाहन सिडको क्षेत्रीय कार्यालय सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग यांनी केले आहे.

नांदेड महापालिकेच्यावतीने आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त मालमत्ता विभाग अजीतपालसिंग संधु, सहाय्यक आयुक्त मनिषा नरसाळे यांच्या आदेशानुसार सिडको क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत असलेल्या थकीत मालमत्ताधारकांसाठी मनपाने लोक अदालतीचे मनपाच्या मुख्य कार्यालयात आयोजन केले आहे. यात एक लाख, पन्नास हजार, तीस हजार व थकीत असलेल्या जवळपास जवळपास १ हजार २६५ मालमत्ताधारकांना सहाय्यक आयुक्त डॉ. मिर्झा बेग, कार्यालय अधिक्षक विलास गजभारे यांच्या सहकार्याने कर निरीक्षक, वसंत कल्याणकर संजय नागापूरकर, मारोती सारंग यांच्या माध्यमातून सहाय्यक शेख शादुला, नारायण आठवले, वसुली लिपीक मालु एनफळे, प्रकाश दर्शने, दीपक जोंधळे, राहुल पाईकराव, विवेकानंद लोखंडे, रमेश यशवंतकर, रविंद्र पवळे, सुधीर कांबळे, नरसिंग कुलकर्णी, नथुराम चवरे, उत्तम जोंधळे या नोटीसांचे वाटप केले आहे.

# 'गाव तिथे शाखा, घर तिथे सभासद' नोंदणी अभियान प्रभावीपणे राबवावे -बाळासाहेब रावणगावकर



**मुदखेड (प्रतिनिधी)**– शहर व तालुक्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी बूथ कमिटी स्थापन करण्यासाठी कामाला लागावे. तसेच 'गाव तिथे शाखा, घर तिथे सभासद' नोंदणी अभियान प्रभावीपणे राबवावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर यांनी केले.

येथील शासकीय विश्राम गृहात दि. ७ मे रोजी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत ते बोलत होते.

स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत निवडणूक लढवण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी काम करावे असेही रावणगावकर यांनी आवाहन केले. या बैठकीला सुरेश बिलेवाड, श्याम पाटील किनाळकर, शंकर पाटील गंड्रस, मोहम्मद बुरान, तालुका उपाध्यक्ष प्रदीप ढगे, ओबीसी जिल्हा उपाध्यक्ष गजानन बोडके, पिंटू शिंदे, दिलीप सरोदे तालुका सरचिटणीस, शेख मुकिद शेख जानीमिया अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष, शेख इरफान अल्पसंख्यांक शहराध्यक्ष, मोहम्मद हकीम उपाध्यक्ष, ज्ञानेश्वर गायकवाड शहर उपाध्यक्ष, शेख खाजामिया शहर उपाध्यक्ष, रामा नारायण गुंजकर, माधव पाटील व्यवहारे, सचिन सुळेकर, मोहम्मद समी, सलमान पठाण, महिला आघाडी शहराध्यक्ष रुक्मिणीबाई कुंचटवाड, तालुका महिला आघाडी उपाध्यक्ष अनुसयाबाई बालाजी हमंद, यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस राहुल चौदंते यांनी केले तर शहराध्यक्ष मोहम्मद बुरान यांनी आभार मानले.

# नांदेड-परळी रेल्वेमार्गाची विभागीय व्यवस्थापकांनी केली पाहणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक प्रदीप कामले यांनी शुक्रवारी नांदेड विभागातील नांदेड ते परळी रेल्वेमार्गांवर तपासणी दौरा केला. या दौऱ्यात विविध पायाभूत सुविधांचा आढावा घेण्यात आला. तसेच भविष्यातील सुरक्षा व कार्यक्षमतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या.





नांदेड ते परळी दरम्यान रेल्वेमार्गावर तपासणी खिडकीतून सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक अशा विविध संरचना, वळणे, ब्रिजेस व सिग्नल यांची बारकाईने पाहणी करण्यात आली.

परभणी आणि गंगाखेड रेल्वे स्थानकांचा विकास अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत करण्यात येत आहे. या रेल्वे स्थानकावरील पुनर्विकास कार्याचा आढावा घेतला आणि उपस्थित अधिकाऱ्यांना सूचना केल्या .

परळी ते वडगाव निळा स्थानकांदरम्यान दरम्यान लेव्हल क्रॉसिंग गेट क्रं. २४, गंगाखेड - पोखर्णी नरसिंहा स्थानकांदरम्यान पूल क्रं. २८ आणि वडगाव निळा गंगाखेड जवळील वळण क्रं. १७ आणि गंगाखेड स्टेशन यार्ड आशा संरचनांची तपासणी करून त्यांची सध्याची स्थिती आणि देखभाल कार्यांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. प्रदीप कामले यांनी गंगाखेड रेल्वे स्टेशन येथील रिले रूम आणि स्टेशन विकास कार्याची पाहणी केली. तसेच वडगाव निळा रेल्वे स्थानकात त्यांनी तेथील रिले रूम, ट्रेक्शन सब स्टेशन यांची पाहणी केली.

या नंतर प्रदीप कामले यांनी परभणी रेल्वे स्थानकाची तपासणी केली. यात त्यांनी स्टेशन मास्तर कार्यालयाची तपासणी केली. प्रीमियम पार्किंग, स्टेशन विकास कार्य, प्रवासी सुविधा यांची पाहणी केली.

या दौऱ्यात वरिष्ठ विभागीय अभियंता पी. सी. रुद्र मूर्ती, वरिष्ठ विभागीय सिग्नल आणि टेलिकॉम अभियंता पी. सुरेश, उप मुख्य अभियंता/ गतीशक्ती /नांदेड श्री निमजे, वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (टीआरएसओ) ए. रवी तेजा, विभागीय विद्युत अभियंता/ टीआरडी सोभन बाबू, सहायक वाणिज्य अधिकारी श्रीनिवास सूर्यवंशी, सहायक सिग्नल आणि टेलिकॉम अभियंता गिरीश कुमार हे विभागीय अधिकारी डीआरएम प्रदीप कामले यांच्यासोबत उपस्थित होते.

# चंदेरी

## टॅक्सी ड्रायव्हरचा मुलगा ते प्रसिद्ध मराठी अभिनेता!



**मराठी सिनेसृष्टीला लाभलेले एक हरहुन्नरी व्यक्तिमत्व म्हणजे अभिनेते भरत जाधव. आजवर त्यांनी मराठी नाटक, मालिका व चित्रपटांमधून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. आज त्यांनी या सिनेसृष्टीत जे नाव कमावलं आहे, त्यामागे त्यांचा खूप मोठा संघर्ष आहे. भरत जाधव यांनी खूप खडतर परिस्थितीतून दिवस काढत आजचं हे यश मिळवलं आहे आणि या यशात त्यांच्या आई-वडिलांचा मोठा वाटा आहे. याबद्दल स्वतः भरत जाधव यांनी अनेक मुलाखतींमधून आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.**

भरत जाधव यांचे वडील हे टॅक्सी ड्रायव्हर होते. १९४८ मध्ये ते मुंबईत येऊन स्थायिक झाले. मुंबईत आल्यानंतर त्यांनी टॅक्सी चालवण्यास सुरुवात केली. त्यांच्या वडिलांना दिवसाला १०० रुपये मिळायचे आणि वडिलांच्या या टॅक्सीवर संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह होत होता. त्या काळात भरत जाधव हे नाटक व चित्रपटांमधून इंडस्ट्रीत त्यांचं नाव कमवण्यासाठी धडपडत होते. अखेर थोडं नाव कमावल्यानंतर भरत जाधव त्यांच्या मुलाखतीत स्वतःचा उल्लेख टॅक्सी ड्रायव्हरचा मुलगा असा करायचे. भरत जाधव यांनी स्वतःला टॅक्सी ड्रायव्हरचा मुलगा म्हणणं ही सहानुभूती नसल्याचे नुकत्याच एका मुलाखतीत सांगितलं आहे. भरत जाधव यांनी सांगितलं की, मी प्रत्येक मुलाखतीत सांगायचो की, मी टॅक्सी ड्रायव्हरचा मुलगा आहे. हे सांगण्यामागे माझी वेगळी कारणं होती, सहानुभूती देणारी कारणं नव्हती. मी त्या घरातून आलो आहे, जिथे आमच्या वडिलांनी खूप मेहनत केली आहे आणि आता बरं वाटतं की त्या मेहनतीचं फळ मिळालं आहे. यानंतर भरत जाधव वडिलांचा किस्सा सांगत म्हणाले की, मी एकदा वडिलांना याबद्दल विचारलं होतं की, अण्णा तुम्हाला वाईट तर वाटत नाही ना मी असं थेट टॅक्सी ड्रायव्हरचा मुलगा आहे असं म्हणतो त्याबद्दल? त्यावर ते एक वाक्य म्हणाले होते की, असं बोलत जा कारण माझ्यासारख्याच अजून कुठल्यातरी टॅक्सी ड्रायव्हरचा मुलगा असेल ना तर त्याला बळ येईल



आणि वाटेल की, हा करू शकतो तर मीसुद्धा करू शकतो. त्याच्याही मनात तो आत्मविश्वास निर्माण होईल. त्यामुळे हे सांगायला लाजायचं कशाला? वडील म्हणायचे, आपण काय चोरी केली आहे का? आपण तर मेहनत केली आहे. टॅक्सी चालवली आहे. त्यात काय गैर नाही. तो पण एक मेहनतीचाच भाग आहे. उद्या त्याच पद्धतीचे वडील किंवा त्याच मेहनतीचा मुलगा काय करत असेल आणि तुझा आदर्श घेत असेल तर ती चांगली गोष्ट आहे. त्यामुळे बोलत जा असं काही नाही. दरम्यान, भरत जाधव यांच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, नुकताच त्यांची महत्त्वाची भूमिका असलेला 'आता थांबायचं नाय' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या चित्रपटातील त्यांच्या भूमिकेचं सर्वत्र कौतुक होत आहे. अशातच आता त्यांचा आगामी 'बंजारा' नावाचा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात त्यांच्याबरोबर शरद पोंक्षे आणि सुनिल बर्वे हे कलाकार आहेत.

### सुनील शेट्टी विशेष मुलाखत

## लोक म्हणायचे, याने चित्रपट सोडून इडली-वडा विकावा...



**अण्णा म्हणून ओळखले जाणाऱ्या सुनील शेट्टी यांनी बॉलीवूड इंडस्ट्रीमध्ये ३३ वर्षे घालवली आहेत. ते त्यांच्या भूमिका, फिटनेस आणि स्पष्टवक्तेपणामुळे सतत चर्चेत राहतात. आता ते नवीन चित्रपट 'केसरी वीर'मुळे चर्चेत आहे. अलीकडेच, दिलेल्या विशेष मुलाखतीत चित्रपट, बॉक्स ऑफिस, त्यांचा संघर्ष, जावई केएल राहुल आणि नात इवारा यांच्यासह इतर अनेक मुद्द्यांवर त्यांनी मनमोकळी चर्चा केली. सुनील शेट्टी यांनी १९९२ मध्ये 'बलवान' या चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण केले होते. तीन दशकांच्या कारकिर्दीत विनोदी ते रोमँटिक, गंभीर आणि नकारात्मक अशा भूमिका त्यांनी साकारल्या. प्रत्येक भूमिकेत खोलवर छाप सोडली. 'केसरी वीर'मध्येही त्यांची मजबूत भूमिका आहे.**

### 'अपयशाला मनावर घेतले नाही अन् यशाला माझ्या डोक्यात जाऊ दिले नाही....'

- प्रश्न : तुम्ही या इंडस्ट्रीत ३३ वर्षांहून अधिक काळ आहात, पण तरीही शुक्रवार तुम्हाला घाबरवतो का? सध्याच्या परिस्थितीत मोठे स्टार बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी करू शकत नाहीत, तुम्हाला काळजी वाटते का?
- सुनील शेट्टी : आज मी यश आणि अपयशाच्या पलीकडे असलो तरी शुक्रवार अजूनही मला घाबरवतो आणि




कारण मला माझ्या उद्योगाची काळजी वाटते. जर चित्रपट यशस्वी झाले तर आपला उद्योग यशस्वी होईल. आपल्या इंडस्ट्रीला चांगले विषय आणि चांगल्या कथांची गरज आहे. प्रेक्षकांच्या मनाला स्पर्श करू शकतील असे विषय असावेत. चित्रपट चालत नाहीत असे नाही. चांगले चित्रपट, मग ते बंगाली, तमिळ, मल्याळम किंवा कन्नड असोत, चालू आहेत. सध्या चांगल्या हेतूने बनवलेल्या चांगल्या चित्रपटाची गरज आहे.

- प्रश्न : तुमच्या कारकिर्दीबद्दल बोलायचे झाले तर, तुम्ही त्या कलाकारांच्या पिढीतील आहात ज्यांनी त्यांच्या कारकिर्दीत खूप संघर्ष केला. तुम्ही हॉटेलमध्ये काम करत असतानाचा काळ कसा होता?
- सुनील शेट्टी : जर मी स्वतःबद्दल बोललो तर, मी भाग्यवान होतो की मला माझ्या वडिलांच्या संघर्षाबद्दल माहिती होती आणि मी अभिमानाने म्हणायचो की वयाच्या ९ व्या वर्षी माझे वडील हॉटेलमध्ये काम करायचे आणि टेबल साफ करायचे. मला नेहमीच त्यांचा अभिमान होता आणि तो अभिमान मी कायम ठेवला आहे. मी स्वतः माझ्या वडिलांसोबत रेस्टॉरंटमध्ये काम करायला सुरुवात केली होती. माझ्या वडिलांनी मला हेच शिकवले, अतिथि देवो भव. खाल्ल्यानंतर किंवा पिल्यानंतर एखाद्या ग्राहकाने मला शिवीगाळ केली तरी मला त्याचा आदर करायला शिकवले गेले. मी त्याला त्याच्या गाडीपर्यंत सोडायचो. आमचा उदरनिर्वाह त्यांच्यावर अवलंबून होता. नम्रता माझ्यात नेहमीच होती. आजही, सेटवर माझी खुर्ची कोणाला दिली तरी मला काही फरक पडत नाही. मला अनेक नकारांचा सामना करावा लागला आहे. पण माझे संगोपन इतके मजबूत आहे की मी सहजासहजी तुटत नाही.
- प्रश्न : तुमचा पहिला चित्रपट 'बलवान' बॉक्स ऑफिसवर सुपरहिट झाला होता...
- सुनील शेट्टी : हो, माझा पहिला चित्रपट बलवान सुपरहिट झाला हे खरे आहे, पण एका खूप मोठ्या समीक्षकाने माझ्याबद्दल म्हटले होते की त्याने चित्रपट सोडून रेस्टॉरंट चालवावे. त्याला इथे काम नाही. त्याने रेस्टॉरंटमध्ये जाऊन इडली-वडा विकावा. त्या टीकाकाराला वाटले की तो असे बोलून माझा अपमान करत आहे. पण माझ्यासाठी हॉटेल चालवणे हा माझा व्यवसाय होता. ते माझे घर चालवणारे होते. माझ्या बहिणी मोठ्या झाल्या, त्याच रेस्टॉरंटमुळे त्यांचे शिक्षण झाले. म्हणून मी असे म्हणतो की माझ्यासाठी रेस्टॉरंटमध्ये काम करणे कधीही लज्जेचे कारण नव्हते. यश अनेक गोष्टी बदलते, परंतु तुम्ही तुमची मुळे विसरू नये. माझ्या वडिलांच्या संघर्षाच्या तुलनेत माझा संघर्ष काहीच नव्हता. मी भाग्यवान आहे की मला इथे संधी मिळाली आणि मी आजही इथे आहे. मी कधीही अपयशाला मनावर घेतले नाही आणि यशाला माझ्या डोक्यात जाऊ दिले नाही.
- प्रश्न : एकेकाळी, तुमचे क्रिकेटर होण्याचे स्वप्न अपूर्ण राहिले होते. पण शेवटी तुम्हाला एक क्रिकेटर जावई (क्रिकेटर केएल राहुल) मिळाला...
- सुनील शेट्टी : (हसत) तुम्ही जी काही इच्छा मनात बाळगाल, ती नक्कीच प्रत्यक्षात येईल. मी माझ्या आयुष्यात हे अनुभवले आहे. हे सर्वांना लागू होते, पण याचा अर्थ असा नाही की एखादी इच्छा किंवा ध्येय प्रकट केल्यानंतर, तुम्ही झोपावे, त्यासाठी कोणतेही प्रयत्न करू नये. तुम्हाला त्यादृष्टीने मेहनत करावी लागेल, प्रयत्न करावे लागणारच आहेत. आजच्या काळात, एआय देखील माझ्यासाठी आयते काहीच करू शकत नाही, कारण मला त्याला आज्ञा द्यावीच लागते. कोणतीही गोष्ट साध्य करण्यासाठी आपल्याला कठोर परिश्रम करावे लागतात. केएल राहुल आमच्या कुटुंबाचा सदस्य आहे याचा मला आनंद आहे. खरंच, तोच माझा क्रिकेटर होण्याचे स्वप्न पूर्ण करत आहे.
- प्रश्न : अलिकडेच तुम्ही आजोबा झालात. अथिया आणि केएल राहुल यांनी मुलीचे एक अतिशय वेगळे नाव (इवारा) ठेवले आहे, आजोबा होण्याचा तुम्हाला किती आनंद होत आहे?
- सुनील शेट्टी : माझी नात इवारा ही अथियाची संपूर्ण प्रत आहे. तुम्ही तिला अथिया 2.0 असेही म्हणू शकता. तुम्ही समजू शकता की मुद्दलपेक्षा व्याज जास्त प्रिय आहे. इवारा म्हणजे देवाकडून मिळालेली देणगी. अथियाचा अर्थही तोच आहे. ती बहुतेकदा आमच्यासोबतच राहते. इमारतीतील सर्व मुले संध्याकाळी ६ नंतर आमच्यासोबत राहतात. संध्याकाळ होताच ते घरी येतात आणि विचारू लागतात, आजोबा आले आहेत का, आजी आली आहेत का?



- प्रश्न : तुमच्या नवीन चित्रपट केसरी वीर बद्दल बोलायचे झाले तर, तुम्ही एक ऐतिहासिक भूमिका साकारणार आहात का?
- सुनील शेट्टी : मला ही भूमिका खूप शक्तिशाली वाटली. अशा प्रकारची व्यक्तिरेखा पडद्यावर क्वचितच पाहायला मिळते. ते पात्र खूप मजबूत वाटत होते. हा चित्रपट आपल्याला आपण कोण आहोत हे शिकवतो आणि मला ही संकल्पना खूप आवडली. चित्रपटाचे दिग्दर्शक प्रिन्स धीमान यांनी विषयाला सर्व प्रकारे न्याय दिला आहे. या भूमिकेसाठी मी शारीरिक प्रशिक्षणही घेतले.

## आमिर खानला करायचीय श्रीकृष्णाची भूमिका



**'द परफेक्शनिस्ट' अशी ओळख असलेला बॉलीवूड अभिनेता आमिर खान त्याच्या वैविध्यपूर्ण कलाकृतींसाठी ओळखला जातो. 'लगान', 'तारे जमीन पर', '३ इडियट्स', 'पी.के', 'दंगल' यांसारख्या वेगळेपण असलेल्या चित्रपटांतून त्यानं प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. या सर्व चित्रपटांमध्ये त्यानं एकापेक्षा एक अशा भूमिका साकारल्या आहेत. अशातच आता आमिर खान लवकरच एका अनोख्या भूमिकेतून प्रेक्षकांसमोर येणार असल्याचं म्हटलं जातंय. आमिर खान सध्या त्याचं ड्रीम प्रोजेक्ट 'महाभारत'वर काम करीत आहे.**


या चित्रपटाचं काम लवकरच सुरू होणार असून, आता नुकतंच आमिरनं 'महाभारत' या चित्रपटाबद्दल सांगितलं आहे. त्यानं सांगितलं, की महाभारतावर आधारित चित्रपट बनवणं हे माझं स्वप्न आहे; पण हे खूप कठीण काम आहे. 'महाभारत'मधील कोणतं पात्र साकारायला आवडेल असं विचारलं असताना त्यानं, मला श्रीकृष्णांचं पात्र साकारायला आवडेल. त्यांचा माझ्यावर खूप जास्त प्रभाव आहे. त्यामुळे जर कुठलं पात्र साकारायचं असेल, तर श्रीकृष्णांचं पात्र साकारायला मला नक्कीच आवडेल, असं म्हटलं आहे. महाभारताचं महत्त्व मोठं असून या चित्रपटातून आपण जगाला दाखवून देऊ की आपल्याकडे काय आहे, असंही त्याने म्हटलं. दरम्यान, आमिर खाननं आजवर त्याच्या अभिनयानं अनेकांची मनं जिंकली आहेत. त्याच्या प्रत्येक चित्रपटाचा एक वेगळा चाहतावर्ग आहे. आता अभिनेता लवकरच 'तारे जमीन पर' या चित्रपटाचा पुढचा भाग 'सितारे जमीन पर' प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येणार आहे. या चित्रपटात त्याच्यासह अभिनेत्री जिनिलीया देशमुखही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे. 'सितारे जमीन पर' हा २००७ साली आलेल्या 'तारे जमीन पर'चा दुसरा भाग आहे. २० जून २०२५ रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

## तिकीटं विकणारा गाजवतोय दाक्षिणात्य सिनेसृष्टी..!



**कलाकार म्हटलं की स्ट्रगल आलेच. त्यात जर एखाद्या कलाकाराकडे अभिनयाचा कोणताही वारसा नसेल, तर त्याच्यासाठी हा प्रवास जास्त कठीण होतो. पण तरीसुद्धा इंडस्ट्रीत कोणतीच ओळख नसतानाही जिद्द व चिकाटीने काम करीत प्रेक्षकांच्या मनावर राज्य करणारे अनेक कलाकार इंडस्ट्रीत आहेत. अशा बऱ्याच कलाकारांच्या खडतर प्रवासमय गोष्टी आपण ऐकत असतो. उदरनिर्वाह करायला म्हणून काही कलाकार अभिनयाव्यतिरिक्त इतर कामे केल्याचेही सांगताना दिसतात. अशातच अभिनेता विजय देवरकोंडानेदेखील जुन्या आठवणींना उजाळा देत त्याचा खडतर प्रवास सांगितला आहे.**

विजय देवरकोंडा तेलुगू इंडस्ट्रीतील प्रसिद्ध अभिनेत्यांपैकी एक आहे. परंतु, त्याचा इथपर्यंतचा प्रवास सोपा नसल्याचे त्याने म्हटलं आहे. मुलाखतीत त्याने याबाबत खुलासा करीत म्हटले होते, महाविद्यालयात रंगभूमीवर काम करीत असताना अभिनयाची आवड निर्माण झाली. तिथे तुम्हाला स्टेजवर अभिनय करण्याची संधी मिळण्याआधी बॅक स्टेजवरील इतर बरीच कामं करावी लागतात. मी सुद्धा बॅक स्टेजला तिकिटं विकली होती. इंडस्ट्रीत काम मिळवणं मला खूप कठीण गेलं. यादरम्यान मी अनेक ऑडिशन्स दिल्या. असंख्य वेळा मला नाकारलं गेलं. माझा नवीन पॉलिशेट्टी नावाचा मित्र होता. ज्याच्याबरोबर मी कुठे ऑडिशन आहे, आधी दिलेल्या ऑडिशनंतर काही उत्तर आलं का याबाबत चर्चा करीत असे. महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झाल्यानंतर जवळपास दोन-तीन वर्षं मी चित्रपटांमध्ये फक्त लहानसहान रोल केलेत. विजयने इंडस्ट्रीत प्रवेश करताना दुसरा प्लॅन तयार ठेवला होता, असे सांगितले आहे.



त्याने ठरवलं होतं की, वयाच्या २५ व्या वर्षापर्यंत इंडस्ट्रीत काहीच करता आलं नाही, तर तो दुसऱ्या क्षेत्रात काम करील. परंतु, त्याने कधीच हार मानली नाही. यात त्याने असेही म्हटले आहे की, बऱ्याचदा मी काही भूमिका नाकारल्याही आहेत. कारण मी कायम मोठ्या संधीच्या शोधात होतो. माझा स्वतःवर तेवढा विश्वास होता. तेव्हा लोक मला तुला कधीच मोठी संधी मिळणार नाही, असं म्हणायचे. दरम्यान, विजय देवरकोंडाने 'येवडे सुब्रह्मण्यम' या चित्रपटात सहायक अभिनेत्याची भूमिका केली होती. त्यामुळे तो पहिल्यांदा प्रसिद्धीझोतात आला. त्यानंतर तो 'वर्ल्ड फेमस लव्हर', 'सामराज्य', 'द फॅमिली स्टार', 'खूशी', 'लायगर' यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये झळकला, तर विजयने त्याच्या अभिनयशैलीने अनेकांना भुरळ घातली आहे. त्यामुळे आता त्याचा मोठा चाहतावर्ग आहे. विजय लवकरच 'किंग्डम' या चित्रपटात झळकणार आहे. येत्या ३० मे रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

# जगाला हेवा वाटेल असे ज्ञानपीठ उभारणार -मुख्यमंत्री




**पुणे (प्रतिनिधी)**– प्राचीन भागवत धर्मातील सनातन आणि कल्याणकारी विचार जगभरात पोहोचविण्यासाठी आळंदी येथे साडेचारशे एकर जागेत जगाला हेवा वाटेल असे संत ज्ञानेश्वर महाराज ज्ञानपीठ उभारण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

आळंदी येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी जन्मोत्सव सोहळ्यात ते बोलत होते. कार्यक्रमाला ह.भ.प. शांतीब्रम्ह गु. मारुती महाराज कुरेकर, आमदार उमा खापरे, शंकर जगताप, बाबाजी काळे, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश महेंद्र महाजन, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पीएआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश म्हसे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त ड. राजेंद्र उमाप, डॉ. भावार्थ देखणे, योगी निरंजन नाथ, ड. रोहणीताई पवार, पुरुषोत्तम पाटील आदी उपस्थित होते.

ज्ञानपीठ आपल्या हातून व्हावे ही ईश्वराची योजना असावी आणि त्याचे समाधानाही असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, ज्ञानपीठ तयार करण्यासाठी ७०१ कोटी रुपयाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. ज्ञानपीठाच्या माध्यमातून भारतीय अध्यात्मिक परंपरेतील मानवी कल्याणाचा शाश्वत विचार जगभरात जाईल. इंद्रायणी नदीचा विकास आराखडा तयार करण्यात आला होता. हा आराखडा सर्व मान्यता घेऊन केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला आहे. लवकरच तो मंजूर करून घेण्यात येईल. याद्वारे पिंपरी-चिंचवड महानगर पालिकेसह ३९ गावातील पाणी शुद्ध करून इंद्रायणीत जाईल. इंद्रायणी नदीचे जल स्वच्छ, निर्मळ आणि पुजनीय होईल असा प्रयत्न करण्यात येईल, अशी ग्वाही श्री. फडणवीस यांनी दिली.

ह.भ.प. शांतीब्रम्ह गु. मारुती महाराज कुरेकर यांनी भागवत धर्म प्रचारासाठी केलेले कार्य लक्षात घेता यांना पद्म पुरस्कार मिळण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

या सोहळ्याच्या निमित्ताने वारकऱ्यांच्या रूपातील पांडुरंगाचे दर्शन करण्याची संधी मिळाली अशी भावना व्यक्त करतांना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, देशात परकीय आक्रमण होत असताना भागवत धर्माला जिवंत ठेवण्याचे कार्य वारकरी संप्रदायाने आणि संतांनी केले. त्यामुळे आपला विचार, संस्कृती आणि धर्म कोणीही नष्ट करू शकला नाही. परकीय आक्रमणाच्यावेळी संत समाजात सुविचार रुजवत होते. त्यामुळे चांगल्या विचारांची परंपरा आजही सुरू आहे.

संत ज्ञानेश्वर माऊलींनी वारकरी संप्रदायाचा पाया रचला आणि संत तुकाराम महाराजांनी त्यावर कळस चढविला. संतांची ही मोठी परंपरा आपल्या देशाला लाभली आहे. जात, पंथ, धर्म विरहित समाज निर्माण करण्याचे कार्य संतांनी केले. वारकरी प्रत्येकात पांडुरंग पाहतो. वारकारी संप्रदायने रुजविलेल्या परंपरेमुळे राज्य अग्रेसर आहे.

भौतिक प्रगतीमुळे शांती मिळत नाही तर मानसिक स्वास्थ्य महत्वाचे आहे. संत परंपरेमुळे, त्यांनी दिलेल्या अध्यात्मिक विचारमुळे समाजाचे मानसिक स्वास्थ्य चांगले आहे. प्रत्येक गावातील भागवत सप्ताहामुळे हा विचार सर्वदूर पोहोचविण्यास मदत होत आहे. अध्यात्मिक बैठकीशिवाय मनःशांती मिळत नाही. या अर्थाने जगातील सर्वात श्रीमंत देश भारत आहे आणि ही श्रीमंती संतांनी टिकवली असल्याचेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.

वारीमध्ये स्वयंशिस्त असते, वारी करणाऱ्यांच्या जीवनात वेगळा आनंद निर्माण होतो. गितेतला विचार वारीद्वारे रुजविण्याचा प्रयत्न होतो. ज्ञानेश्वर माऊलींनी गितेतील हा विचार ज्ञानेश्वरीच्या रूपाने मराठीतून मांडला. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाविताना ज्ञानेश्वरी ग्रंथ उदाहरण म्हणून प्रस्तुत करण्यात आला, असेही श्री. फडणवीस म्हणाले. अशा अध्यात्मिक सोहळ्याच्या माध्यमातून विचारांचे वैभव पुन्हा प्रस्थापित करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

दरम्यान योगी निरंजननाथ यांनी प्रस्ताविकात सोहळ्याची माहिती दिली. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचा श्री. ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्यावतीने गौरवपत्र देऊन सन्मान करण्यात आला.श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या समग्र वाययाचा साक्षेपी चिंतनात्मक आढावा घेणाऱ्या 'नमो ज्ञानेश्वरा' या ग्रंथाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. तसेच याच पुस्तकाच्या ऑडिओ बुकचे अनावरणही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

या सोहळ्यात अन्नदान करणाऱ्या जगताप कुटुंबियांचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रमात समाविष्ट होणार -मंत्री भुसे



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – हिंदवी स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास देशभरातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या माध्यमातून अधिक व्यापक स्वरूपात माहिती व्हावे, यासाठी महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारकडे महत्त्वपूर्ण मागणी केली असून, ती मागणी तात्काळ मान्य करण्यात आली आहे. राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यात नवी दिल्लीत पार पडलेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीदरम्यान हा ऐतिहासिक निर्णय आज घेण्यात आला. या बैठकीत शैक्षणिक सुधारणांसह अनेक महत्त्वपूर्ण मागण्या व प्रस्ताव मांडण्यात आले, ज्यांना केंद्रीय शिक्षणमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

शास्त्री भवन येथे प्रधान यांच्या कार्यालयात संपन्न झालेल्या या बैठकत केंद्रीय शिक्षण आणि साक्षरता विभागाचे सचिव संजय कुमार, अतिरिक्त सचिव अनिल कुमार सिंघल, अतिरिक्त सचिव आनंद पाटील, राज्याच्या शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव, रणजीतसिंह देओल, शिक्षण आयुक्त संचिंद्र प्रताप सिंह, राज्य शैक्षणिक विभाग व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल रेखावार तसेच अन्य वरिष्ठ अधिकारीही या बैठकीला उपस्थित होते.

या बैठकीदरम्यान स्वराज्य निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास देशव्यापी शैक्षणिक अभ्यासक्रमात अधिक व्यापक स्वरूपात समाविष्ट करण्याची महत्त्वपूर्ण मागणी महाराष्ट्र शासनाकडून करण्यात आली. ही मागणी तात्काळ मान्य करत, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी संबंधित सचिवांना केंद्रीय पाठ्यपुस्तक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या पाठ्यपुस्तकांमध्ये याचा समावेश करण्याचे निर्देश दिले. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास देशभरातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून उपलब्ध होणे, ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची बाब असल्याचे, असे श्री. भुसे यांनी बैठकीनंतर प्रसार माध्यमांना महाराष्ट्र सदन येथे ही माहिती दिली.यासोबत, मराठी भाषेला केंद्र सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिल्याच्या पार्श्वभूमीवर, मराठी भाषेचा राष्ट्रीय शैक्षणिक पातळीवर उचित समावेश होण्याबद्दलची मागणी केली. या मागणीला प्रधान यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, याबाबत योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन यावेळी दिले. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असल्याचे भुसे यांनी यावेळी सांगितले.

या बैठकीत महाराष्ट्रात सध्या राबवण्यात येणाऱ्या शैक्षणिक योजनांचे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये 'पीएम श्री' योजनेच्या धर्तीवर राज्यात 'सीएम श्री' योजनेअंतर्गत ५,००० शाळांना आदर्श शाळा बनवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. यासोबत, १०० पेक्षा जास्त विद्यार्थी असलेल्या वर्गांना आदर्श वर्ग, स्मार्ट क्लासरूम, आनंद गुरुकुल आणि विभागनिहाय विशेष शाळा सुरू करण्याचा प्रस्तावही सादर करण्यात आला.

# राज्यभरात तिरंगा रॅली, ऑपरेशन सिंदूरच्या समर्थनार्थ पदयात्रा

**मुंबई (प्रतिनिधी)**– राज्यातील महायुती सरकारकडून विविध जिल्ह्यात तिरंगा रॅलीचं आयोजन करण्यात आलं आहे. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीत सैन्य दलाच्या समर्थनार्थ आणि भारतीय जवानांचे मनोबल वाढविण्यासाठी तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आलं आहे.

भारताने ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला. त्यानंतर, भारतीय सैन्य दल आणि भारत सरकारच्या समर्थनार्थ अनेक जिल्ह्यात ही रॅली निघणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचाही या रॅलीत सहभाग असणार आहे. यांसह, महायुतीमधील अनेक मंत्री आपल्या आपल्या जिल्ह्यातून या रॅलीत सहभाग घेणार आहेत. मात्र, राष्ट्रवादीकडून तिरंगा रॅलीचं नियोजन नसून अजित पवार हे नांदेड दौऱ्यावर आहेत. ते शहीद कुटुंबीयांची भेट घेणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्या रविवारी नागपुरात तिरंगा रॅली निघणार असून 'ापरेशन शिंदूर'च्या समर्थनार्थ ही तिरंगा रॅली काढण्यात येत आहेत. या तिरंगा रॅलीत मोठ्या प्रमाणात नागपूरकर सहभागी होणार आहेत.

# 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेद्वारे ग्रामीण भागात विकासाचे नवे पर्व सुरू

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्यातील जलसंपत्तीचे शाश्वत व्यवस्थापन आणि शेतीला पोषण देणारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची दूरदृष्टीपूर्ण संकल्पनेतला 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही योजना महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात विकासाचे नवे पर्व घडवते आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश म्हणजे धरणांत साचलेल्या गाळाचे शास्त्रशुद्ध व्यवस्थापन करून त्याचा पुनर्वापर शिवारांमध्ये करणे. परिणामी, जलसाठ्याची क्षमता वाढवली जाते आणि गाळातील पोषणमूल्ययुक्त माती शेतजमिनीत वापरून जमिनीची सुपीकता सुधारली जाते. ही योजना विशेषतः अल्पभूधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांसाठी वरदान ठरली आहे.

गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार ही योजना अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्त्वाची योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून धरणे, बंधारे आणि तलावांमधील गाळ काढून त्या परिसरातील जमिनीवर टाकला जातो.शासन त्यासाठी निधी उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे शेतजमिनीची सुपीकता वाढते आणि पाणी साठवण क्षमता देखील सुधारते. अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे मर्यादित संसाधने असतात, त्यामुळे त्यांना नैसर्गिक साधनसंपत्तीच्या योग्य वापरामुळे थेट फायदा होतो. शासनाचा उद्देशही शेतकऱ्यांना स्वयंपूर्ण करणे व नैसर्गिक संसाधनांचा शाश्वत वापर सुनिश्चित करणे हाच आहे. त्यामुळे ही योजना अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी फारच उपयुक्त ठरत आहे.

१ एप्रिल २०२४ ते ७ एप्रिल २०२५ या कालावधीत राज्यात १२७४ एकूण ६६.९१ कोटी घनमीटर गाळ काढण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले होते, त्यापैकी ४२.२९ कोटी घनमीटर गाळाचे उत्खनन पूर्ण झाले असून, हे लक्ष्याच्या ६३ टक्के इतके आहे. ही भरघोस कामगिरी प्रशासनाच्या प्रभावी अंमलबजावणीबरोबरच शेतकऱ्यांच्या उत्स्फुर्त सहभागामुळे शक्य झाली आहे.योजनेसाठी राज्य शासनाकडून २७८१.८ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली असून, आतापर्यंत १५४९.९ कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

# दोन तोतया आरटीओंना अटक

**बीड (प्रतिनिधी)**– बीड स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मुंबईच्या दोन तरुणांना एका गंभीर गुन्ह्याप्रकरणी अटक केली आहे. हे दोनही तरुण अनेक दिवसांपासून आरटीओ अधिकारी बनून वाहनचालकांकडून वसूली करत होते. पोलिसांना याबाबत माहिती मिळाल्यानंतर मोठ्या शिताफिने दोघांना अटक केली. या दोन्ही आरोपींची चौकशी केली असता हे दोन तरुण बेरोजगार असल्याने त्यांनी हि फसवेगिरी केल्याचे उघड झाले आहे.

बेरोजगारी तरुणांना गुन्हेगार बनवते असे बरेचदा समोर येते. हाती काम नसल्याने आणि झटपट श्रीमंत होण्याच्या नादात युवक चुकीच्या मार्गाला लागतात. आणि देशोधडीला लागतात. चुकीच्या मार्गाने भरपूर पैसा कमावण्याच्या नादात तरुण आपले संपूर्ण आयुष्य पणाला लावतात. अशीच एक घटना बीड मधून समोर आली आहे. अजय बालाजी गाडगे (वय २४ रा. घाटकोपर, मुंबई) आणि दिनेश मंगल धनसर (अं. वय २८ रा. मुंबई) या दोन तरुणांनी पैसा कमावण्यासाठी अनोखी शक्कल लढवली. मुंबईचे हे दोन सुशिक्षित बेरोजगार तरुण नकली आरटीओ अधिकारी बनले. त्यांच्याजवळ असलेल्या स्कार्पिओ गाडीला आरटीओचे लोगो लावत रस्त्यावरच वाहनचालकांची अडवणूक करुन त्यांना लुटायचे.

# इन्स्टा जाहिरातीची भूल; शेअर गुंतवणुकीत निवृत्त अधिकाऱ्याने गमावले २.३० कोटी

**मुंबई (प्रतिनिधी)**– एका प्रसिद्ध कंपनीतून निवृत्त झालेल्या अधिकाऱ्याने इन्स्टाग्रामवरील जाहिरातीला भुलून सव्वा दोन कोटी रुपये गमावले. 'आमच्यामार्फत शेअर बाजारात गुंतवणूक करा आणि चांगला परतावा मिळवा,' अशी आकर्षक जाहिरात पाहून या निवृत्त अधिकाऱ्याने बँकेतील बचतीची रक्कम गुंतवली. मात्र पैसे काढण्याची वेळ आली, त्यावेळी फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत.

शेअर ट्रेडिंग क्षेत्रातील नामांकित कंपनीची जाहिरात तक्रारदाराने इन्स्टाग्रामवर पाहिली. बाजारातील घडामोडीशी साम्य असलेली माहिती मिळत असल्याने या अधिकाऱ्याचा विश्वास बसला. त्यांनी टप्प्याटप्प्याने तब्बल दोन कोटी ३० लाख रुपये वेगवेगळ्या कंपन्यांच्या शेअरमध्ये आणि आयपीओमध्ये गुंतविले.

गुंतविलेल्या रकमेवर नफा जमा होत असल्याचे पवर दिसत होते. मात्र काही रक्कम काढण्याचा प्रयत्न केला असता, रक्कम काढता येत नव्हती. कंपनीच्या प्रतिनिधींकडून टाळाटाळ केली जात होती. संशय आल्याने या अधिकाऱ्याने मूळ कंपनीच्या पत्त्यावर जाऊन शहानिशा केली. त्यावेळी अशी कोणतीच सेवा देत नसल्याचे कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. अंधेरी परिसरात राहणाऱ्या ५४ वर्षीय शिक्षिकेची ५० लाखांची फसवणूक करण्यात आली आहे. फसव्या ट्रेडिंग ॲपमध्ये गेल्या महिन्याभरात तिने ही रक्कम गुंतवली आणि प्रत्यक्षात तिला ही रक्कम काढता आलीच नाही.

# कारची लक्झरी बसला धडक; १५ वर्षीय मुलासह वडील ठार

**बीड (प्रतिनिधी)** – राज्यातील रस्ते अपघाताचे प्रमाण गेल्या काही वर्षात वाढल्याचे पाहायला मिळत असून केंद्रीय दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांनी देखील याबाबत चिंता व्यक्त केली होती. वर्तमानपत्रात किंवा माध्यमांमध्ये सातत्याने अपघाताच्या बातम्या येत असून महामार्गावरच हे अपघात घडत असल्याचे दिसून येते. आता, बीड जिल्ह्यातील पाटोद्याजवळ एका भीषण अपघातात वडिल आणि मुलाचा दुर्दैवी अंत झाला आहे. दरम्यान, दोघांचेही मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत.

बीडच्या पाटोदा शहराजवळ पुण्याहून केजकडे जाणारी भरधाव वेगातील कार पुलाच्या कठड्याला धडकून ट्रॅव्हल्सवर जाऊन आदळली. या अपघातात अश्फाक शेख (४० वर्षे) आणि त्यांचा मुलगा अल्ताफ शेख (१५ वर्षे) हे दोघेही जागीच ठार झाले आहेत. पुण्यावरुन हे दोघेही आपल्या गावी म्हणजेच केजकडे येत होते. मात्र, पाटोदाजवळ आले असता त्यांच्या कारचा अपघात झाला. चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने ती कार पुलाच्या कठड्याला धडकली. त्यानंतर तीन पलट्या खाऊन समोरून येणाऱ्या एका खासगी कंपनीच्या ट्रॅव्हल्सवर जाऊन आदळली. त्यात कारमधील दोघांचाही मृत्यू झाला.

# पुढील ३ वर्षांसाठी लष्करप्रमुखांना सर्वाधिकार; संरक्षण मंत्रालयाकडून गॅझेट जारी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – भारत-पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीत बैठकांचा जोर असून गृहमंत्री अमित शाह यांनी नुकतीच प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. दुसरीकडे संरक्षण मंत्रालयाने सैन्य दलाला महत्त्वाचे अधिकार दिले असून पुढील ३ वर्षांपर्यंत हे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. तिनही सैन्य दलाच्या प्रमुखांसाठी संरक्षण मंत्रालयाकडून गॅझेट अधिसूचना जारी करण्यात आली आहे.

टेरिटोरियल आर्मी नियम १९४८ च्या नियम ३३ नुसार भूदल प्रमुखांना अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार, टेरिटोरियल आर्मीच्या सर्वच अधिकारी आणि सैनिकांना आवश्यक सुरक्षा ड्यूटी नियमित सेना के समर्थन में सक्रिय सेवेत बोलवू शकतात. सध्या ३२ टेरिटोरियल आर्मी इन्फँट्री बटालियनमधील १४ बटालियन देशाच्या विविध सैन्य दलांना, साउदर्न कमांड, ईस्टर्न कमांड, वेस्टर्न कमांड, सेंट्रल कमांड, नॉर्दर्न कमांड, साउथ-वेस्टर्न कमांड, अंदमान व निकोबार कमांड आणि आर्मी ट्रेनिंग कमांड येथे तैनात करण्यात येईल.

संरक्षण मंत्रालयाकडून गॅजेट अधिसूचना प्रसिद्ध करुन लष्करप्रमुखांना म्हणजेच सेनाध्यक्षांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. सैन्य सेवेसंदर्भात ९ फेब्रुवारी २०२८ पर्यंत सेनाध्यक्षांकडे हे सर्वाधिकार असणार आहेत. त्यामुळे, भारत सरकारने पुढील ३ वर्षांसाठी सैन्य दलाच्या प्रमुखांना युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अधिकार दिले आहेत. त्यानुार, टेरिटोरियल आर्मीतील अधिकाऱ्यांना बोलवण्याचे अधिकार सेनाध्यक्षांना असणार आहेत. तसेच, देशभरातील सर्व सैन्यसेवेतील अधिकारी, सैनिकांच्या ड्युटी लावण्याचे अधिकारही सेनाध्यक्षांना प्रदान झाले आहेत. यासंदर्भात ६ मे रोजी अधिसूचना काढण्यात आली व ८ मे ला गॅझेट करण्यात आले आहे.

# बांबू लागवडीसाठी यंत्रणांनी टार्गेट घेऊन काम करावे -पटेल



**पूणे (प्रतिनिधी)** – पुणे जिल्ह्यातील भोर आणि वेल्हा तालुक्यात बांबू लागवड लोकप्रिय असली तरी मोठी संधी असूनही उर्वरित पुणे जिल्ह्यात बांबू लागवड झालेली नाही. या पुढील काळात क्षेत्रिय स्तरावर कर्मचाऱ्यांना व्यक्तीशः टार्गेट देऊन पुणे जिल्ह्यात मराग्रारोहयो अंतर्गत बांबू लागवडीचे ध्येय निश्चित करावे, असे आवाहन मुख्यमंत्री पर्यावरण संतुलित कृती दलाचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल यांनी केले आहे.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत बांबू लागवड अभियान विषयक आढावा बैठक (ता.९) मुख्यमंत्री पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्सचे कार्यकारी अध्यक्ष पाशा पटेल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

या महत्त्वाच्या बैठकीला उपजिल्हाधिकारी रोहयो डॉ. चारुशीला देशमुख-मोहीते, डॉ. कृपाण घोष, प्रमुख, अँग्रीमेट विभाग, के. सी. साई कृष्णन, प्रमुख, IMD पुणे, डॉ.ओ.पी. अभिजीत, शास्त्रज्ञ IMD, डॉ. एस.डी. सानप, शास्त्रज्ञ IMD, आरती बंडकर, शास्त्रज्ञ IMD, नवनाथ अवताडे, उपप्रादेशिक अधिकारी म.प्र.निः मंडळ पुणे, आर. वाय. पाटील, कार्यकारी अभियंता, सा. बां. पुणे आणि सं. स. विश्वासराव, उपसंचालक, जि. अ.कृ.अ. पुणे या महत्त्वाच्या बैठकीला उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. चारुशीला देशमुख-मोहीते म्हणाल्या, २०२४-२५ साठी ३०० हेक्टर उद्दिष्ट देण्यात आले होते. २०२५-२६ साठी ४५० हेक्टर उद्दिष्ट देण्यात आले. एकूण पाच वर्षातील ३००० हेक्टर उद्दिष्ट पैकी २०२४-२५ मध्ये १३३.६ हेक्टर इतकी लागवड झाल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना पाशा पटेल म्हणाले. पुणे जिल्ह्यामध्ये क्षमता असूनही बांबू लागवडी मध्ये दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते. वातावरण बदलाचे संकट दिवसेंदिवस वाढत आहे. इस्रायलमधील तेल अविव आणि अमेरीकेत कैलिफोर्नियात आग लागली.२०२४ हे सर्वाधिक उष्ण वर्ष ठरले असून दिल्ली तापमान ५२.९ डिग्री पर्यंत गेल्याचे प्रसारमाध्यमांमध्ये प्रसिद्ध झाले होते. ४७ डिग्री तापमानामध्ये माणुस मरतोय. दुबई होरपळतेयं तिथे तापमान ६५ डिग्री पर्यंत पोहोचले आहे. एकंदरीतच वातावरण बदलाच्या संकटामुळे मानवजातीसमोरचे सगळे मार्ग खुंटले आहेत, असे ते म्हणाले.

कार्बन इमिशन (उत्सर्जन) दिवसेंदिवस वाढत असल्याचे सांगत ते म्हणाले की, २०५० पर्यंत समुद्र किनारी असणारे देश आणि शहरे बुडणार आहेत. कोळसा आधारित औष्णीक प्रकल्प बंद करावे लागणार आहेत.

सर्वांनाच आता पर्यावरण पुरक वस्तु वापराव्यात लागणार आहेत, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. वेगाने वाढणारा बांबु एकमेव गवत वर्गीय वृक्ष असून बांबू बहुउपयोगी ठरत आहे. यावेळी बोलताना भारतीय हवामान विभागाचे शास्त्रज्ञ डॉ. एस. डी. सानप म्हणाले, औद्योगिक विकासाने कार्बन उत्सर्जन वाढले आहे. पारंपारिक उर्जा स्रोत वापराने कार्बन इमिशन वाढले. त्यामुळे वातावरण बदल होऊन कृषी क्षेत्राला वातावरण बदलाचा मोठा फटका बसत आहे.

तापमानातील वाढ, कमी कालावधीत जास्त पाऊस, ढगफुटी, वादळे घटक शेती बरोबरच आरोग्य वनक्षेत्र आणि जलसंधारण या विभागांना प्रभावित करत असल्याचे कडे त्यांनी लक्ष वेधले. पुणे जिल्ह्याचा विचार करता फक्त भोर आणि बिल्ला तालुक्यांमध्ये पारंपारिक रित्या बांबूच्या गोड होत आहे परंतु क्षमता असू नये शिरूर सह आंबेगाव आणि जिल्ह्यातील अनेक भागात ज्या ठिकाणी सिंचनातून जमिनी नापीक झाल्या अशा भागात देखील बांबू लागवडीसाठी मोठी संधी असल्याचे पाशा पटेल यांनी सांगितले.

प्रत्येक यंत्रणेमध्ये क्षेत्रीय पातळीवरील कर्मचाऱ्यांना टार्गेट देऊनच यापुढील काळात बांबू लागवडीचे ध्येय गाठले जाईल, असे यावेळी सर्व अधिकाऱ्यांनी एकमताने आश्वासित केले.

**शासन अनुदानीत शाळा कर्मचारी कल्याण सहकारी पतसंस्था म.हदगाव**

**पंचवार्षीक निवडणुक सन 2025-30**

**निवडणुक कार्यक्रम**

| अ.क्र. | तपशिल | दिनाक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | नामनिर्देशन पत्र विक्री व स्वीकृती | 13/5/2025 ते 19/5/2025 | स.11.00 ते दु 3.00 |
| 2 | नामनिर्देशन पत्र छाननी | 20/5/2025 | 11.00 पासुन संपेपर्यंत |
| 3 | नामनिर्देशन पत्र मागे घेणे | 21/5/2025 ते 4/6/2025 | स.11.00 ते दु 3.00 |
| 4 | उमेदवारास निशानी वाटप | 5/6/2025 | स.11.30 |
| 5 | मतदान | 15/6/2025 | स.8 ते दु.4 |
| 6 | मतमोजणी | 15/6/2025 | मतदान संपल्यानंतर 1 तासाने |
| 7 | निकाल | 15/6/2025 | मतमोजणी नंतर लगेच |

(डी.यु.पाटील)
निवडणुक निर्णय अधिकारी    जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी    सचिव, राज्य सहकारी निवडणुक अधिकारी
शासन अनु...पतसंस्था म.हदगाव    नांदेड    महाराष्ट्र राज्य पुणे

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## जिल्ह्यात एफटीकेव्दारे पाणी तपासणी जनजागृती मोहीमेत सहभागी व्हावे -सीईओ मेघना कावली

**नांदेड (प्रतिनिधी)–** जल जीवन मिशनअंतर्गत जिल्ह्यात ग्रामीण भागात शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होण्यासाठी १२ मे ते ७ जून या कालावधीत एफटीके जनजागृती अभियान राबविले जाणार आहे. या अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये फिल्ड टेस्ट किट (FTK) च्या वापराबाबत जनजागृती करून, नियमित पाणी तपासणीस प्रोत्साहन दिले जाणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांनी दिली.



जल जीवन मिशन व राष्ट्रीय पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांतर्गत मान्सूनपूर्व कालावधीत जिल्ह्यातील सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांची जैविक व रासायनिक तपासणी केली जात आहे. ही नमुना तपासणी दररोज प्रत्येक तालुक्यात करण्यात येणार असून, संबंधित माहिती केंद्र शासनाच्या पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे.

ग्रामपंचायतीत निवडलेल्या पाच महिला व शालेय विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत एफटीकेव्दारे प्रत्यक्ष पाणी तपासणीचे प्रात्यक्षिक दाखवले जाईल. नळ जोडण्या, शाळा, अंगणवाड्यांतील पाण्याचे नमुने तपासण्यात येणार आहेत. या अभियानात शिक्षण, ग्रामविकास, महिला व बालकल्याण विभाग यांचाही सक्रिय सहभाग राहणार आहे. ग्रामस्तरावर मोठ्या प्रमाणात जनजागृती करून सहभागी होण्याचे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनचे प्रकल्प संचालक नारायण मिसाळ, कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब व माहिती, शिक्षण व संवाद सल्लागार डॉ. नंदलाल लोकडे, जिल्हा पाणी गुणवत्ता सल्लागार कपेंद्र देसाई यांनी केले आहे.

## मुगटच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील बागेत अचानक आग

**मुदखेड (प्रतिनिधी) –** तालुक्यातील मुगट येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे शनिवारी दि. १० मे रोजी दुपारी १.३० च्या सुमारास अचानक वैद्यकिय अधिकारी यांच्या निवासस्थान परिसरातील बागे मध्ये अचानक आग लागली. अचानक आग लागल्याने विविध प्रकारची आयुर्वेदिक वनस्पतीची झाडे जळाली.



आग विझवण्यासाठी वैद्यकिय अधिकारी श्रीमती डॉ. झिकरे, सुपरवायझर प्रदीप राठोड, आरोग्य सेविका हिंगोले, आरोग्य कर्मचारी शिवाजी शिंदे, केसरबाई, परिचारिका तोडे, परिचर राठोड यांनी आग विझविली.

## गोदाम फोडून साडेतीन लाखांचे सोयाबीन लंपास

**किनवट (प्रतिनिधी) –** तालुक्यातील बोधडी (बु.) येथील एक सोयाबीनचे गोदाम फोडून अज्ञात चोरट्यांनी साडेतीन ते चार लाख रूपये किमतीचे सोयाबीन चोरुन नेले.

बोधडी येथे प्रशांत सिरमवार या व्यापाऱ्याचे गोदाम आहे. सदर गोदामात सोयाबीनची पोती साठविण्यात आली होती. अज्ञात चोरट्यांनी बुधवारी दि.७ सिरमनवार यांचे गोदाम फोडले.आतील साडेतीन ते चार लाखांची १३० ते १४० पोती चोरट्यांनी पळवून नेली. याप्रकरणी व्यापारी प्रशांत सिरमनवार यांच्या तक्रारीवरुन पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१ (४),३०५ (अ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## वासरी शिवारात अवैध वाळुचा सव्वादोन कोटींचा मुद्देमाल जप्त

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)–** ऑपरेशन फ्लश आउट अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या पथकाने मुदखेड तालुक्यातील वासरी शिवारात शुक्रवारी (दि. ९) रात्री कारवाई करून दोन जेसीबी, तीन हायवा असा दोन कोटी २८ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच हायवा चालक, मालकांवर मुदखेड ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना अवैध वाळू उपसा व वाहतुक करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने मुदखेड तालुक्यातील वासरी नदीघाटात जेसीबीच्या सहाय्याने अवैध वाळू उपसा होत असल्याची गोपनीय माहिती मिळताच १० मे रोजी रात्री पहाटे एक वाजताच्या सुमारास पोलीस निरीक्षक खंडेराय यांचे पथकप्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाव्हुळे, पोलीस उपनिरीक्षक आनंद बिच्चेवार, मिलिंद सोनकांबळे, बळीराम दासरे, अंमलदार बामणे, मलदोडे, स्वामी, पवार, चव्हाण, घेवारे आणि लोणे यांनी मुदखेड तालुक्यातील वासरी शिवारात कारवाई केली. यावेळी अवैध वाळू उपसा करणारे २ जे.सी.बी. किमती ८० लाख रूपये तसेच एकुण १२ ब्रास वाळुसह भरलेले ३ हायवा किंमत १ कोटी २० लाख २८ हजार ८०० रूपये असा एकुण दोन कोटी २८ हजार आठशे रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

यावेळी पोलिसांनी नागेश चांदू कलवले (वय २९ चालक कृष्णानगर मुदखेड), श्यामसिंह संजयसिंह गौर (वय ३५ चालक पाथ्रड तालुका मुदखेड), योगेश हरी कल्याणे (वय २४ चालक राहणार वासरी तालुका मुदखेड) श्रीकांत बालाजी उमाटे (वय १९ जेसीबी चालक वासरी) यांना अटक केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वावळे यांच्या फिर्यादीवरून वरील चार जणांसह फरार एक जेसीबी चालक आणि सर्व वाहनांच्या मालकाविरुद्ध मुदखेड ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## तुषार गांधी आज नांदेडमध्ये

**नांदेड (प्रतिनिधी)–** महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी हे 'हम भारत के लोग' या अभियाना अंतर्गत ११ मे रोजी नांदेडला भेट देणार आहेत. यावेळी विविध गांधीवादी आणि पुरोगामी चळवळीतील कार्यकर्त्यांशी दुपारच्यावेळी हितगुज केल्यानंतर सायंकाळी ४ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे संवाद साधणार आहेत.



'हम भारत के लोग' या अभियाना अंतर्गत महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी हे पहिल्यांदाच नांदेडला ११ मे रोजी भेट देणार आहेत. ११ मे रोजी मुंबईहून नांदेडला आल्यानंतर विश्रामगृह येथे विविध चळवळीतील गांधीवादी व पुरोगामी विचारांच्या कार्यकर्त्यां सोबत ते हितगुज करणार आहेत. दुपारी ४ वा. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे माजी खा. डॉ. व्यंकटेश काब्दे व खा. रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते नांदेडकरांशी संवाद साधणार आहेत. यावेळी तुषार गांधी यांच्या समवेत फिरोज मिट्टीबोरवाला, शरद कदम हे उपस्थित राहणार आहेत.




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com